THE

# Bombay Government Gazette.

Published by Authority.

THURSDAY, 13TH MARCH 1890.

☞ *Separate paging is given to this Part, in order that it may be filed as a separate compilation.*

## PART IX.—Marathi Acts, &c.

**मुंबई इलाक्यांतील डिस्ट्रिक्ट पोलिसाचें नियमन करण्याबाबदचा कायदा सुधारण्याकरितां आक्टाचा मसुदा (सन १८८९ चा नंबर ३) याचा विचार करण्यासाठीं नेमिलेल्या सिलेक्ट कमिटीचा-रिपोर्ट.**

आह्मी, सन १८८९ चा मसुदा नंबर ३ (मुंबई इलाक्यांतील डिस्ट्रिक्ट पोलिसाचें नियमन करण्याबाबदचा कायदा सुधारण्याकरितां आक्टाचा मसुदा) याचा विचार करण्यासाठीं नेमिलेल्या सिलेक्ट कामिटीचे मेंबर, खालीं दिल्याप्रमाणें रिपोर्ट सादर करितों:—

१. सदहूं मसुदा तारीख १२ माहे डिसेंबर सन १८८९ रोजीं इंग्रजींत, तारीख २ माहे जानेवारी सन १८९० रोजीं मराठींत व गुजराथींत आणि तारीख ७ मिनहू रोजीं कानडींत प्रसिद्ध करण्यांत आला.

२. उत्तर भागाचे कमिशनर मि. प्रोपर्ट, व अमदाबादचे जिल्हा-माजिस्ट्रेट मि. जेम्स यांजकडून आह्मां-कडे दोन यादी आल्या आहेत; त्यांत या मसुद्याच्या धोरणाच्या व त्यांतील इतर पुष्कळ गोष्टींच्या संबंधानें दोष काढून फार सूक्ष्म रीतीनें विचार केला आहे. या गृहस्थांचें असें ह्मणणें आहे कीं, चालू कायद्यांत कमिशनरांस व जिल्हा माजिस्ट्रेटांस जे अधिकार आहेत, ते या मसुद्यांत कमी करून इन्स्पेक्टर जनरल आफ् पोलीस याचे अधिकार वाढविले आहेत; हें बरें नाहीं. या ह्मणण्याचा आह्मीं लक्षपूर्वक विचार केला, परंतु आमचा अभिप्राय असा आहे कीं, या मसुद्यांत, जिल्हा माजिस्ट्रेट, कमिशनर आणि इन्स्पेक्टर जनरल आफ् पोलीस यांच्या अधिकाराची हद्द, पुरेशा रीतीनें आणि राज्यकारभार चालविण्यास जरूर लागणाऱ्या ज्या गोष्टी त्यांकडे योग्य लक्ष पुरवून निर्दिष्ट केली आहे. कर्तव्यांची व निर्बंधाची तपशीलवार वाटणी, या आक्टाअन्वयें जे कानू करावयाचे आहेत, त्यांच्या द्वारें करून घेतां येईल. तथापि, सुपरिंटेंडेंटांच्या कृत्यांवर निर्बंध ठेवतांना इन्स्पेक्टर जनरल आफ् पोलीस व जिल्हा माजिस्ट्रेट यांच्या अधिकारांमध्यें विरोध येऊं नये अशा रीतीनें १२ वें कलम आह्मीं बदललें आहे; आणि कलम २० यांत कांहीं फेरफार करून आह्मीं पोलिसाच्या हिशेबाचें नियमन करण्याचा व त्याची पाहाणी करण्याचा कामिशनरांस पूर्ण अधिकार दिला आहे.

३. मंडळ्या, मिरवणुकी, वगैरे यांत अव्यवस्था न होऊं देण्याबाबद कलम ४० यांत ठराव आहेत; आतां त्या कलमांत फेरफार करून, मारण्यासाठीं दगड गोळा करण्याचा प्रतिबंध केला आहे. आह्मीं, ४० अ व ४० ब हीं दोन नवीं कलमें दाखल केलीं आहेत; यांच्या योगानें जिल्हा माजिस्ट्रेटास, मोठी अव्यवस्था न होऊंदेण्याबाबद ज्यास्त बंदोबस्ताचे पूर्वोपाय करितां येतील.

४. कलम ४७ यांत एक नवीन रकम दाखल केली आहे; तिच्या योगानें, पोलीस अमलदारांस, चोरलेली आहे अशी दिसणारी मिळकत ज्यांच्या जवळ असेल त्यांचा झाडा घेण्याचा अधिकार प्राप्त होईल. हा ठराव इलाका शहरांत फार उपयोगीं पडतो असें दिसून आलें आहे.

५. या आक्टाअन्वयें काढिलेले हुकुम व जाहिरनामे शाबीत करण्याची रीत स्पष्ट करण्यासाठीं कलम ७१ अ हें दाखल केलें आहे; आणि पद्धतींत व काम चालविण्यांत क्षुल्लक दोष असल्याच्या योगानें कानू व हुकुम रद्द होऊं नयेत यासाठीं कलम ७१ ब हें सामील केलें आहे.

६. सरकारी नोकर स्वतःच्या हुद्याच्या कर्त्यांच्या संबंधानें दावा केले जाण्यास कितीं पात्र आहेत, तें, दावा करण्याच्या पूर्वीं काय तजविजी कराव्या लागतात तें, आणि वादीनें योग्य नोटिस न दिल्यास काय परिणाम होतात तें, स्पष्ट होईल अशा रीतीनें ७२ वें कलम बदललें आहे. नुकसान करणाऱ्यास नुकसान भरून देण्याची सबब मिळावी असा या नोटिशीचा उद्देश आहे. त्यानंतर निर्णय करण्याचें काम कोर्टांवर सोंपविलें आहे.

७. सरकारानें अगर सरकारच्या अमलदारांनीं अपले अधिकार उल्लंघून जे कानू अगर हुकुम केले असतील, त्यांच्या अमलाचा परिणाम न होऊं देण्यासाठीं साधा व योग्य उपाय असावा यासाठीं कलम ७२ अ सामील केलें आहे.

८. मूळ मसुद्यांत सदरील व इतर जे फेरफार केले आहेत, ते, जाहीर वर्तमानपत्रांतून आलेली टीका व आमच्या कडे आलेली इतर टीका यांचा लक्षपूर्वक विचार करून आणि आमच्या अनुभवाच्या आधारानें तो मसुदा सूक्ष्म रीतीनें तपासून, दाखल केले आहेत. जे फेरफार विशेष रीतीनें निर्दिष्ट केलेले नाहींत, ते मूळ मसुद्यांत केलेले क्षुल्लक फेरफार आहेत. अगर ते जातीनें इतके स्पष्ट आहेत कीं, त्यांचा खुलासा करण्याची मुळींच जरूर नाहीं.

९. आमच्या पैकीं एक मेंबर, नामदार सरदार राव बहादुर बेहेचरदास विहारिदास यांनीं, कलम ४९, रकम (ब) यांत "देवळें" हा शब्द राहूं देण्यास हरकत घेतली आहे; परंतु बाकीचे मेंबर तो शब्द काढून टाकण्यास शिफारस करूं शकत नाहींत. या कमिटीच्या त्याच मेंबराची अशी सूचना आहे कीं, "गांवरक्षक" अगर "चौकीदारांची मंडळी" ठेवण्याचा रिवाज कायदेशीर ठरवावा. या रिवाजाप्रमाणें, जे लोक आपलें पीक वगैरे राखण्यासाठीं पैसा देतात, त्या लोकांचीं उभीं अगर कापलेलीं पिकें, व घरें वगैरे राखण्याबद्दल गांवच्या रहिवाशांपैकीं कांहीं रहिवाशी जबाबदार राहातात. हा रिवाज व्यवहारांत पुष्कळदां उपयोगी पडतो, हें बाकीच्या मेंबरांस कबूल आहे; परंतु त्यांचें असें मत आहे कीं; हा रिवाज कायदेशीर ठरवावयाचा असल्यास तो एकाद्या गांवच्या पोलीसबाबद आक्टाअन्वयें उत्तम रीतीनें कायदेशीर ठरवितां येईल. शेवटीं आमची अशी सूचना आहे कीं, हा मसुदा सध्याच्या स्थितींत मंजूर व्हावा.

(सही) आर. वेस्ट.
" जे. बी. रिचि.
" एफ़. एल्. लाथाम.
" एफ्. फोर्बस् आडाम.
" बेहेचरदास विहारिदास.
" आर. एम्. सयानी.

तारीख २१ माहे फेब्रुवारी सन १८९०.

## सन १८८९ चा मसुदा नंबर ३.

### मुंबई इलाक्यांतील डिस्ट्रिक्ट पोलिसाचें नियमन करण्याबाबदचा कायदा सुधारण्याकरितां आक्टाचा मसुदा.

मुंबई इलाक्यांतील डिस्ट्रिक्ट पोलिसाचें नियमन करण्याबाबदचा कायदा सुधारणें ज्या अर्थी योग्य आहे, त्या अर्थी खालीं लिहिल्याप्रमाणें ठरविण्यांत येत आहे:—

### बाब १ ली.—प्रथमारंभींचे नियम.

१. ह्या आक्टास "सन १८८८ चा मुंबईचा डिस्ट्रिक्ट पोलीस आक्ट" असें ह्मणावें; — लहान सरनामा.

(१) तो, सिंध, मुंबई शहर, एडन व त्याचीं ताबेदार संस्थानें आणि पेरिम हीं शिवायकरून सगळ्या मुंबई इलाक्यास लागू आहे असें समजावें. — व्याप्ति.

(२) तो, परिशिष्टांसहित सगळा अगर त्याचा कोणताहि भाग, गव्हर्नर इन् कौन्सिल यांच्या हुकुमावरून, सिंध प्रांतास अगर एडन व त्याचीं ताबेदार संस्थानें आणि पेरिम यांस लागू करितां येईल. — सिंध, एडन व त्याचीं ताबेदार संस्थानें आणि पेरिम यांस लागू करणें.

२. कलम १, पोट-कलम (१), यांतील ठराव लागू राहून, परिशिष्ट अ यांत नमूद केलेले कायदे, त्या परिशिष्टाच्या तिसऱ्या आसनांत निर्दिष्ट केलें आहे तेथवर रद्द केले आहेत; परंतु त्या कायद्यांपैकीं कोणत्याहि कायद्याअन्वयें केलेली कोणतीहि गोष्ट ह्या ठरावावरून रद्द होते असें समजूं नये. — कायदे रद्द केले आहेत.

मुंबईचे गव्हर्नर इन् कौन्सिल यांच्या कोणत्याहि कायद्यांत, ह्या आक्टावरून रद्द झालेल्या कोणत्याहि कायद्याचे दिलेलें सर्व हवाले, ह्या आक्टाच्या मिळत्या भागावर दिले आहेत असें समजावें.

अशा कोणत्याहि कायद्याअन्वयें केलेले सर्व कानू, हुकुम व नेमणुका आणि दिलेले सर्व अधिकार व दाखले, हीं कृत्यें, त्यांचा ह्या आक्टाशीं मेळ बसेल तेथवर, ह्या आक्टाअन्वयें झालीं आहेत असें समजावें.

३. ह्या आक्टांत, विषयास अगर संदर्भास बाध येत नसेल तर,— — व्याख्या.

(अ) "इन्स्पेक्टर जनरल," "डिस्ट्रिक्ट सुपरिंटेंडेंट" व "असिस्टंट सुपरिंटेंडेंट" ह्या संज्ञांचा अर्थ, अनुक्रमें, ह्या आक्टाअन्वयें नेमिलेला — "इन्स्पेक्टर जनरल," "डिस्ट्रिक्ट सुपरिंटेंडेंट" "असिस्टंट सुपरिंटेंडेंट;"

इन्स्पेक्टर जनरल आफ् पोलीस, डिस्ट्रिक्ट सुपरिंटेंडेंट आफ् पोलीस व असिस्टंट व सुपरिंटेंडेंट आफ् पोलीस असा समजावा;

"पोलिस अमलदार."

(ब) "पोलीस अमलदार" ह्मणजे ह्या आक्टाअन्वयें नेमिलेल्या पोलीस फौजेपैकीं कोणताहि मनुष्य, असें समजावें;

"कान्स्टेबल."

(क) "कान्स्टेबल" ह्मणजे कनिष्ठ दर्जाचा पोलीस अमलदार असें समजावें;

"जिल्हा."

(ड) "जिल्हा" ह्मणजे सन १८८२ च्या क्रिमिनल प्रोसीजर कोडाच्या कारणांसाठीं जिल्हा ह्मणून ठरविलेला मुलुखाचा भाग, असें समजावें;

"रस्ता."

(इ) "रस्ता" ह्या शब्दांत, कोणत्याहि हमरस्त्याचा आणि कोणत्याहि बांधावरच्या, पुलावरच्या, सेतूवरच्या, कमानीवरच्या, कीवरच्या अगर धक्क्यावरच्या रस्त्याचा, आणि ज्यांत लोकांचा प्रवेश होतो असा कोणताहि मार्ग, गल्ली, पायरस्ता, चवाठा, चौक, अळी अगर वाट, (मग हीं रहदारीचीं असोत अगर नसोत,) यांचा समावेश होतो असें समजावें;

"गुरें."

(फ) "गुरें" या शब्दांत, हत्ती, उंट, घोडे, गाढवें, खेचरें, मेंढरें, शेळ्या व डुकरें यांचा समावेश होतो असें समजावें.

क्रिमिनल प्रोसीजर कोडांत व्याख्या केलेले शब्द व संज्ञा.

(ग) सन १८८२ च्या क्रिमिनल प्रोसीजर कोडांत ज्या शब्दांचा व संज्ञांचा व्याख्येनें जो अर्थ दिला आहे, त्या शब्दांचा व संज्ञांचा तोच अर्थ ह्या आक्टांत लागू आहे असें समजावें.

---

## बाब २ री.—पोलिसाची रचना.

### साधारण.

दरेक जिल्ह्यांत पोलीस फौज ठेविली जाईल.

४. मुंबई इलाख्यांतील हा आक्ट लागू असलेल्या प्रत्येक जिल्ह्यांत, सरकारास, गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांच्या निर्बंधास पात्र राहून, एक पोलीस फौज स्थापण्याचा व ठेवण्याचा अखत्यार आहे; त्या पोलीस फौजेच्या निरनिराळ्या दर्जांतील लोकांची संख्या, तिची रचना, तिचीं कामें, तिचे हक्क व अधिकार हीं यापुढें ठरविल्याप्रमाणें व निर्दिष्ट केल्याप्रमाणें असतील आणि, सदरीं सांगितलेले अधिकारी वेळोवेळीं फर्मावितील व मंजूर करितील त्याप्रमाणें त्या फौजेस पगार व नेमणुका मिळत जातील.

इन्स्पेक्टर जनरल आफ् पोलीस याची नेमणूक व त्याचा अधिकार.

५. (१) मुंबई इलाख्याच्या ज्या भागास हा आक्ट लागू आहे त्या प्रत्येक भागाच्या पोलीस फौजेवर अधिकार चालविण्यासाठीं, आणि तिची देखरेख ठेवण्यासाठीं गव्हर्नर इन् कौन्सिल यांनीं एक इन्स्पेक्टर जनरल आफ पोलीस नेमिला पाहिजे; त्या इन्स्पेक्टर जनरलास, ह्या आक्टाचे ठराव आणि या संबंधाचे सरकारचे कानू व हुकुम लागू राहून, यापुढें ठरविल्याप्रमाणें कामें करावीं लागतील, अधिकार चालवावे लागतील व जबाबदारी धारण करावी लागेल;

(२) इन्स्पेक्टर जनरलास त्याच्या हुद्यावरून सस्पेंड करण्याचा अगर बर्तर्फ करण्याचा गव्हर्नर इन् कौन्सिल यांस अधिकार आहे. त्याला सस्पेंड अगर बर्तर्फ करणें.

६. गव्हर्नर इन् कौन्सिल यांस, प्रत्येक जिल्ह्यासाठीं एक सुपरिंटेंडेंट आफ् पोलीस आणि योग्य वाटतील तितके आसिस्टंट सुपरिंटेंडेंट आफ पोलीस नेमण्याचा आणि त्या अमलदारांपैकीं योग्य वाटेल त्या अमलदारास बर्तर्फ करण्याचा, सस्पेंड करण्याचा, कमी पगारावर घालण्याचा, काढून टाकण्याचा अगर बदलण्याचा अधिकार आहे. डिस्ट्रिक्ट सुपरिंटेंडेंट व असिस्टंट सुपरिंटेंडेंट यांची नेमणूक.

७. प्रत्येक कमिशनरास त्याच्या निर्बंधाखालच्या सर्व जिल्ह्यांत, आणि इन्स्पेक्टर जनरल आफ् पोलीस यास सगळ्या इलाक्यांत पहिल्या वर्गाच्या माजिस्ट्रेटाचे अधिकार असतील; परंतु ते अधिकार, त्यांनीं, स्थानिक सरकार वेळोवेळीं जी मर्यादा ठरवील, त्या मर्यादेबरहुकूम चालविले पाहिजेत. कमिशनरांस व इन्स्पेक्टरांस माजिस्ट्रेटी अधिकार असतील; ते अधिकार त्यांनीं सरकारच्या हुकुमांस अनुसरून चालविले पाहिजेत.

८. इन्स्पेक्टर जनरल यास, गव्हर्नर इन् कौन्सिल यांच्या हुकुमास पात्र राहून, प्रत्येक जिल्ह्याकरितां जरूर असतील तितके इन्स्पेक्टर नेमण्याचा अधिकार आहे. इन्स्पेक्टरांची नेमणूक.

९. इन्स्पेक्टरच्या खालच्या दर्जाचे पोलीस अमलदार दरेक जिल्ह्यांत डिस्ट्रिक्ट सुपरिंटेंडेंटाकडून नेमण्यांत येतील; आणि त्यांच्या नेमणुका, मंजुरी संबंधानें, हुद्यांच्या संबंधानें, परस्परांमधल्या संबंधांच्या संबंधानें व नोकरीच्या अटींच्या संबंधानें त्या त्या वेळीं चालू असलेल्या कायद्यास अनुसरून सरकार वेळोवेळीं जे कानू करील, त्यांस पात्र राहातील असें समजावें. इन्स्पेक्टरच्या दर्जाखालच्या पोलीस अमलदारांची नेमणूक.

१०. इन्स्पेक्टराची नेमणूक झाल्यावर त्यास इन्स्पेक्टर जनरलाकडून नेमणुकीचा दाखला मिळेल; त्या दाखल्यांत त्याचा कोम, नांव, वय, जात अगर धर्म, आणि पूर्वीं त्याची कांहीं नोकरी झालेली असल्यास ती, यासंबंधानें माहिती असेल. इन्स्पेक्टरांस नेमणुकीचे दाखले दिले जातील.

११. (१) इन्स्पेक्टरच्या दर्जाखालच्या प्रत्येक पोलीस अमलदारास, त्याचें नांव पटांत दाखल केल्यावर, परिशिष्ट ब यांत दिलेल्या नमुन्याबरहुकूम व त्याचें नांव ज्या जिल्ह्यांत पटांत दाखल केलें जाईल त्या जिल्ह्याच्या माजिस्ट्रेटाच्या शिक्यानिशीं एक दाखला देण्यांत येईल. इन्स्पेक्टरच्या दर्जाखालच्या पोलीस अमलदारांस हुद्याचे दाखले दिले जातील.

(२) सदर्हूप्रमाणें नेमिलेल्या प्रत्येक मनुष्यास त्या नेमणुकीवरून पोलीस अमलदाराचे अधिकार, कामें, हक्क, व जबाबदाऱ्या प्राप्त होतात असें समजावें. सदर्हू प्रकारचे दाखले धारण करणाऱ्यांचे अधिकार.

(३) अ. नेमणुकीच्या दाखल्यांत निर्दिष्ट केलेल्या मनुष्यांचा व पोलिसाचा कोणत्याहि कारणावरून संबंध तुटेल तेव्हां तो दाखला रद्दबातल होतो असें समजावें. असे दाखले रद्दबातल केव्हां होतात तें.

ब. कोणत्याहि पोलीस अमलदारास प्राप्त झालेले अधिकार, कामें व हक्क, तो पोलीस अमलदार हुद्यावरून सस्पेंड केला जाईल त्या मुदतीपर्यंत महकूब राहतील. असा पोलीस अमलदार याप्रमाणें सस्पेंड झाल्यावरून पोलीस अमलदार नाहीं असें समजूं नये; परंतु तो सस्पेंड न झाल्याप्रमाणेंच त्याजवर जबाबदाऱ्या राहतील व तो आपल्या अधिकाऱ्यांच्या निर्बंधांत राहील. दाखले धारण करणारांचे अधिकार वगैरे कांहीं वेळपर्यंत बंद ठेवणें.

१२. डिस्ट्रिक्ट सुपरिंटेंडेंटानें, इन्स्पेक्टर जनरल आणि जिल्हामाजिस्ट्रेट हे आपापल्या अधिकाराच्या हद्दींत जे हुकुम करितील त्यांस पात्र राहून, हत्यारें, कवाईत, कसरत, मनुष्यांवर व घडत असलेल्या गोष्टींवर नजर ठेवणें, परस्परांचा संबंध, कामें वाटणें; कायद्यांचा, हुकुमांचा आणि काम चालविण्याच्या रीतींचा अभ्यास या संबंधाच्या आणि आपल्या जिल्ह्यांतील पोलीस फौजेस आपलें काम करतांना बजावणीच्या डिस्ट्रिक्ट सुपरिंटेंडेंटाचे सामान्य अधिकार.

बाबतींत ज्या गोष्टी उपयोगी पडत असतील त्या संबंधाच्या सर्व बाबतींत हुकुम करून त्यांचें नियमन केलें पाहिजे.

जिल्ह्याच्या माजिस्ट्रेटाचा निर्बंध;

१३. (१) कोणत्याहि जिल्ह्याचा डिस्ट्रिक्ट सुपरिंटेंडेंट व तेथील पोलीस फौज हीं, त्या जिल्ह्याच्या माजिस्ट्रेटाचे हुकुमांत व निर्बंधात असतील.

तो सरकारच्या कानूस व हुकुमांस व कमिशनरच्या कायदेशीर हुकुमांस पात्र राहील.

(२) गेल्या शेवटल्या पोट-कलमाअन्वयें अधिकार चालवितांना, जिल्हा माजिस्ट्रेटानें, गव्हर्नर इन् कौन्सिल हे वेळोवेळीं ह्या कारणासाठीं ठरवितील त्या कानूंवरहुकुम व हुकुमांवरहुकुम वागलें पाहिजे, आणि तो कमिशनराच्या कायदेशीर हुकुमांस पात्र राहील.

कानू हुकुम करितेवेळीं पोटकलम (१) यांच्या हेतूंस इन्स्पेक्टर जनरल यानें पुष्टी आणिली पाहिजे.

(३) इन्स्पेक्टर जनरल यांनीं ह्या आक्टाअन्वयें केलेल्या कानूंत व हुकुमांत पोट-कलम (१) यांतील हेतूंस पुष्टी आणिली पाहिजे.

जिल्हा माजिस्ट्रेटानें मागितल्याबरोबर इन्स्पेक्टर जनरलानें कोणत्याहि जिल्ह्यात जास्त पोलीस फौज दिली पाहिजे.

१४. आपल्या जिल्ह्याकडून मिळणार नाहीं अशा पोलीस फौजेची निकडीची गरज आतां लागणार आहे किंवा अमुक वेळीं लागेल असा कोणत्याहि जिल्ह्याच्या माजिस्ट्रेटाचा अभिप्राय झाला असतां त्यानें त्याबद्दल इन्स्पेक्टर जनरलास कळविलें पाहिजे, आणि त्या इन्स्पेक्टर जनरलानें करवेल तितकी जिल्हा माजिस्ट्रेटाची मागणी मान्य केली पाहिजे.

जिल्हा माजिस्ट्रेटास डिस्ट्रिक्ट सुपरिंटेंडेंटाकडून रिपोर्ट मागण्याचा अखत्यार आहे.

१५. जिल्हा माजिस्ट्रेटास, डिस्ट्रिक्ट सुपरिंटेंडेंटाकडून, गुन्ह्यांसंबंधानें, गुन्ह्यांनीं उपजीविका करणाऱ्या लोकांच्या स्थितीच्या संबंधानें, अव्यवस्था न होऊं देण्याच्या संबंधानें, मेळे व तमाशे यांचें नियमन करण्याच्या संबंधानें, पोलीस फौज वांटून देण्याच्या संबंधानें, जादा साधनांचा उपयोग करण्याच्या संबंधानें, आणि पोलीस फौजेवरचा आपला निर्बंध वाढविण्याच्या व व्यवस्था राखण्याच्या इतर सर्व बाबतींच्या संबंधानें कोणत्याहि गोष्टीविषयीं विशेष अगर सामान्य रिपोर्ट मागविण्याचा अखत्यार आहे.

आपल्या जिल्ह्याच्या पोलीस फौजेवर देखरेख करण्याचे जिल्हा माजिस्ट्रेटाचे सामान्य अधिकार.

१६. डिस्ट्रिक्ट सुपरिंटेंडेंटाचा ताबेदार असा कोणताहि अमलदार आपल्या ठिकाणास अगर आपल्या स्वतःच्या कर्तव्यांस अगदीं अयोग्य अगर नालायक आहे असें जिल्हा माजिस्ट्रेटास आढळून आल्यास, आणि त्या अमलदारास काढून टाकण्याचा अधिकार त्या सुपरिंटेंडेंटास असल्यास, त्या अमलदाराचे जागीं दुसरा नेमण्याबद्दल त्या सुपरिंटेंडेंटास हुकुम करण्याचा त्या माजिस्ट्रेटास अखत्यार आहे; आणि त्या सुपरिंटेंडेंटानें त्या हुकुमाप्रमाणें वागलें पाहिजे. आणि, इन्स्पेक्टरच्या अगर त्याहून वरच्या दर्जाच्या अमलदाराच्या बाबतींत त्या, जिल्हा-माजिस्ट्रेटानें इन्स्पेक्टर जनरल यास फर्माविलें पाहिजे, आणि त्या इन्स्पेक्टर जनरलानें, ती हकीकत कळतांच, त्या माजिस्ट्रेटाच्या अभिप्रायाचा पूर्ण विचार केल्यानंतर काय तजवीज करावयाची ती करावी; आणि आपण केलेल्या हुकुमांबद्दल त्यास कळवावें.

पोलीस फौजेस कामावर योजण्याच्या संबंधानें हुकुम करण्याचा कमिशनराचा अधिकार.

१७. (१) कोणत्याहि कमिशनरास, आपल्या अधिकारांतल्या भागांतील कोणत्याहि जिल्ह्यांतल्या पोलीस फौजेस कामावर योजण्याच्या संबंधानें, त्या जिल्ह्याच्या माजिस्ट्रेटास जो हुकुम करितां येतो, तो हुकुम करण्याचा, आणि शिवाय, निकडीच्या प्रसंगीं, आपल्या भागांतील एका जिल्ह्यांत कामावर नेमलेल्या अशा पोलीस फौजेचा कोणताहि अंश त्या भागाच्या दुसऱ्या कोणत्याहि जिल्ह्यांत कामावर पाठविण्याबद्दल हुकुम करण्याचा अखत्यार आहे.

असा हुकुम साधारणतः जिल्हा माजिस्ट्रेटास करून इन्स्पेक्टर जनरलास कळवावा.

(२) पोट-कलम (१) अन्वयें केलेला कोणताहि हुकुम, तो ज्या जिल्ह्याच्या संबंधाचा असेल, त्या जिल्ह्याच्या माजिस्ट्रेटाकडे पाठविला पाहिजे; परंतु, जरूर असेल तेव्हां, तो हुकुम परभारें डिस्ट्रिक्ट सुपरिंटेंडेंटाकडे पाठविण्याचा अखत्यार आहे; मात्र अशा प्रसंगीं तो त्या जिल्ह्याच्या माजिस्ट्रेटास कळविला पाहिजे.

अशा प्रत्येक बाबतींत तो हुकुम कमिशनरानें इन्स्पेक्टर जनरल यास कळविला पाहिजे.

कमिशनरास आपल्या भागांतील पोलिसाचीं व्यंगें इन्स्पेक्टर जनरलाच्या दृष्टोत्पत्तीस आणून देण्याचा अखत्यार आहे.

१८. कोणत्याहि कमिशनराच्या दृष्टोत्पत्तीस आलेल्या गोष्टींपैकीं ज्या गोष्टी इन्स्पेक्टर जनरलाच्या अधिकारांतल्या असतील त्या गोष्टींच्या संबंधानें, त्या कमिशनरास, आपल्या अधिकारांतल्या भागापैकीं कोणत्याहि जागेंतल्या पोलिसाच्या व्यवस्थेच्या संबंधाचीं अगर त्यांतल्या लोकांच्या योग्यतेच्या संबंधाचीं व्यंगें इन्स्पेक्टर जनरलाच्या दृष्टोत्पत्तीस आणून देण्याचा अखत्यार आहे. अशा कोणत्याहि सूचनेचा लक्षपूर्वक विचार करून, दृष्टोत्पत्तीस आणिलेलीं व्यंगें सुधारतां येतील तितकीं सुधारणें आणि तकरारीचीं कारणें काढून टाकतां येतील तितकीं काढून टाकणें हें इन्स्पेक्टर जनरलचें काम आहे असें समजावें. आणि त्यानें या बाबतींत आपण केलेली तजवीज कमिशनरास कळविली पाहिजे.

गुन्ह्यांची स्थिति वगैरे बाबतींत रिपोर्ट करण्यासाठीं जिल्हामाजिस्ट्रेटास हुकुम करण्याचा कमिशनरास अखत्यार आहे.

१९. कोणत्याहि कमिशनरास, आपल्या अधिकाराखालच्या भागाचा कारभार चांगल्या रीतीनें चालविण्यासाठीं अवश्य वाटतील तसे कोणत्याहि जिल्ह्यांतील गुन्ह्याच्या स्थितीच्या संबंधाचे, त्या जिल्ह्यांतील पोलिसाच्या वाटणीच्या संबंधाचे आणि गुन्ह्याचा व अव्यवस्थेचा बंदोबस्त करण्यासाठीं केलेल्या व्यवस्थेच्या संबंधाचे रिपोर्ट व माहिती, हीं पुरविण्याबद्दल त्या जिल्ह्याच्या माजिस्ट्रेटास हुकुम करण्याचा, आणि ते आल्यानंतर कायद्यास अनुरूप असे हुकुम काढण्याचा, अखत्यार आहे. असा प्रत्येक हुकुम जिल्हा माजिस्ट्रेटास उद्देशून करावा, आणि इन्स्पेक्टर जनरलास कळवावा.

पोलिसाच्या जमाखर्चाच्या सर्व बाबतींबद्दल चौकशी करण्याचा व त्याचें नियमन करण्याचा कमिशनरास अखत्यार आहे.

२०. कोणत्याहि कमिशनरास, सरकारच्या हुकुमांस पात्र राहून, आपल्या अधिकाराखालच्या भागांतील पोलिसाच्या संबंधाच्या जमाखर्चाच्या सर्व बाबतींत तपास करण्याचा आणि त्यांचें नियमन करण्याचा अधिकार आहे; आणि, त्या जमाखर्चाशीं संबंध असलेल्या सर्व मनुष्यांनीं, तपास करण्याच्या प्रसंगीं, त्या कमिशनरास वाजवी मदत आणि सवड दिली पाहिजे; आणि अशा चौकशी नंतर तो जे कायदेशीर हुकुम देईल, ते त्यांनीं मान्य केले पाहिजेत.

## विशेष.

विशेष पोलीस अमलदार नेमणें.

२१. (१) कोणत्याहि गैरकायद्याच्या मंडळीचा जमाव, अगर कोणताहि दंगा अगर स्वस्थतेचा इतर प्रकारचा भंग झाला आहे, अगर होईल अशी वाजवी रीतीनें भीति वाटत आहे असें, आणि, उपयोगीं पडण्यासारखी पोलीस फौज, ज्या प्रदेशांत तसा जमाव, दंगा अगर इतर प्रकारचा स्वस्थतेचा भंग झाला असेल अगर होण्याची भीति असेल त्या प्रदेशांत स्वस्थता राखण्यासाठीं, आणि रहिवाशांचे व मालमिळकतीचें रक्षण करण्यासाठीं पुरेशी नाहीं असें, कोणत्याहि शहरांत अगर जागेंत हुकुमत असलेल्या दुसऱ्या वर्गाच्या अगर त्याहून श्रेष्ठ दर्जाच्या कोणत्याहि माजिस्ट्रेटाच्या दृष्टोत्पत्तीस आल्यास, त्यास, चीफ कान्स्टेबलपेक्षां दर्जानें कमी नाहीं अशा कोणत्याहि पोलीस अमलदारानें अर्ज केला असतां, स्वदस्तुरी व आपल्या हुद्याच्या शिक्क्यानें मोहोर केलेला असा लेखी हुकुम देऊन, स्पेशल पोलीस अमलदार होण्यास योग्य व तयार असतील अशा लोकांपैकीं आपणास योग्य वाटतील तितक्या लोकांना आपणास जरूर वाटेल त्या कालपर्यंत व विवक्षित हद्दींच्या आंत विशेष पोलीस अमलदार नेमण्याचा अखत्यार आहे.

विशेष पोलीस अमलदाराचे अधिकार व जबाबदाऱ्या.

(२) सदरीं सांगितल्याप्रमाणें नेमिलेल्या प्रत्येक विशेष पोलीस अमलदारास, साधारण पोलीस अमलदाराचेच अधिकार, कामें, हक्क व सुटी असतील, त्याचींच कामें करावीं लागून त्याच्या जबाबदाऱ्या धारण कराव्या लागतील, व तो साधारण पोलीस अमलदार ज्या अधिकाऱ्यांच्या निर्बंधाखालीं असतो त्याच अधिकाऱ्यांच्या निर्बंधाखालीं राहील; परंतु त्यास कलम ११ अन्वयें हुद्याचा दाखला देणें जरूर पडणार नाहीं.

## जादा पोलीस.

खासगी मनुष्यांच्या मागणी-वरून जादा पोलीस कामावर लावणें.

२२. (१) जिल्हा माजिस्ट्रेटाच्या सामान्य निर्बंधास पात्र राहून, कोणत्याहि डिस्ट्रिक्ट सुपरिंटेंडेंटास, जिल्ह्यांतील कोणत्याहि ठिकाणीं स्वस्थता राखण्यासाठीं किंवा पोलिसचीं इतर कामें करण्यासाठीं जादा पोलीस पाठविणें जरूर आहे असें दाखवून तशा जादा पोलिसासाठीं कोणत्याहि मनुष्यानें अर्जी केली असतां, त्या कामासाठीं त्या ठिकाणीं जादा पोलीस पाठविण्याचा अख्त्यार आहे.

अशा जादा पोलिसाचा खर्च.

(२) सदर्हूप्रमाणें पाठविलेले जादा पोलीस, अर्जी करणाऱ्या मनुष्याच्या खर्चानें ठेविले जाईल; परंतु त्यावर पोलिस अधिकाऱ्यांचा हुकुम चालून जिल्हा माजिस्ट्रेटास अगर डिस्ट्रिक्ट सुपरिंटेंडेंटास योग्य दिसेल तोंपर्यंत तें कामावर ठेविलें जाईल.

खर्च द्यावयाची मुदत केव्हां पुरी होते तें.

(३) मात्र इतकेंच कीं, ज्या मनुष्याचे अर्जीवरून तें जादा पोलीस कामावर ठेविलें असेल त्या मनुष्यानें कोणत्याहि वेळीं त्या जिल्ह्याचे माजिस्ट्रेटास अगर डिस्ट्रिक्ट सुपरिंटेंडेंटास तें पोलिस काढून नेण्याची लेखी सूचना केली तर, ती सूचना पावल्याच्या तारिखेपासून एका महिन्याहून जास्त नाहीं अशी जी मुदत सदरील जिल्हा माजिस्ट्रेट अगर डिस्ट्रिक्ट सुपरिंटेंडेंट ठरवील ती पुरी झाली ह्मणजे त्या जादा पोलिसाच्या खर्चाचा भार त्या मनुष्यावरून उतरतो असें समजावें.

मोठालीं कामें चालविणाऱ्या मनुष्यांच्या खर्चानें त्या कामांजवळ जादा पोलीस ठेवणें.

२३. (१) आपल्या जिल्ह्यांतील कोणत्याहि जागीं बांधीत असलेल्या अगर चालू असलेल्या कोणत्याहि रेलवेवर, कालव्यावर अगर इतर सार्वजनिक कामावर अगर कारखान्यांत अगर कारखान्यावर अगर व्यापाराचे इतर कामांत अगर कामावर लाविलेल्या मनुष्यांचे वर्तणुकीवरून किंवा ते अमुक प्रकारची वर्तणूक करितील असें वाजवी रीतीनें वाटल्यावरून त्या जागीं जादा पोलीस ठेवणें अवश्यक आहे असें कोणत्याहि जिल्हा माजिस्ट्रेटास वाटल्यास, त्यास, सरकारची मंजुरी घेऊन, आपणांस योग्य वाटेल तितके जादा पोलीस त्या ठिकाणीं पाठविण्याचा आणि तें पोलीस जितके दिवस तेथें कामावर ठेवणें अवश्यक आहे असें त्यास वाटेल तितके दिवस तें तेथें ठेवण्याचा अख्त्यार आहे.

अशा जादा पोलिसाचा खर्च.

(२) सदर्हू प्रकारचें जादा पोलीस कामावर ठेवणें तें, तें काम, कारखाना अगर व्यापाराचें काम जो मनुष्य बांधीत असेल अगर चालवीत असेल त्याच्या खर्चानें ठेवलें पाहिजे आणि त्या मनुष्यानें, तो खर्च, त्या जिल्ह्याच्या माजिस्ट्रेट, सरकारच्या मंजुरीनिशीं वेळोवेळीं ठरवील त्या दरांनीं व त्या वेळीं दिला पाहिजे.

खर्च देण्याबद्दलच्या तक्रारी.

(३) कलम २२ अगर कलम २३ या खालच्या कोणत्याहि बाबतींत तक्रार होईल तेव्हां, रकम किती द्यावयाची व ती कोणीं द्यावयाची यांबाबदचा जिल्हा माजिस्ट्रेटाचा निकाल निर्णयात्मक समजावा, आणि याप्रमाणें ठराविलेली रकम, जिल्हा माजिस्ट्रेटाच्या हुकमावरून, कलेक्टरानें ती देण्याबद्दल जो मनुष्य जबाबदार आहे ह्मणून ठरविलें जाईल, त्याजकडे थकलेल्या जमीनमहसुलाच्या बाकीप्रमाणें वसूल करावी.

सार्वजनिक स्वस्थतेस विशेष भय उत्पन्न झालें असतां जादा पोलीस कामावर ठेवणें.

२४. (१) गव्हर्नर इन् कौन्सिल यांस, मुंबई सरकारी गॅझेटांत जाहिरनामा देऊन, ज्या कोणत्याहि प्रदेशांत अस्वस्थता अगर भय उत्पन्न झालें आहे असें त्यांस वाटेल अगर ज्या प्रदेशांतल्या रहिवाशांच्या अगर त्यांपैकीं कोणत्याहि एकाद्या विवक्षित भागाच्या वर्तणुकेवरून पोलिसाचो संख्या कांहीं काळपर्यंत वाढविणें योग्य आहे असा त्यांचा अभिप्राय झाला असेल त्या प्रदेशांत आपणांस वाटेल तितक्या मुदतीपर्यंत वेळोवेळीं जादा पोलीस ठेवण्याबद्दल हुकुम करण्याचा अख्त्यार आहे.

अशा जादा पोलिसाचा खर्च.

(२) अशा जादा पोलिसाचा सर्व खर्च अगर त्याचा कोणताहि भाग, सरकारानें तसा हुकुम केला तर, तो जाहिरनामा ज्या प्रदेशास लागू असेल त्या प्रदेशांतील

साधारणतः सर्व रहिवाशांवर अगर त्यांपैकीं कोणत्याहि एकाद्या विवक्षित भागावर कर बसवून त्याच्या उत्पन्नांतून भागविला पाहिजे.

(३) म्युनिसिपल डिस्ट्रिक्ट खेरीजकरून इतर ठिकाणीं सदहू प्रकारचा कर कलेक्टरानें आपल्या नजरेस येईल त्याप्रमाणें आकारला पाहिजे; आणि तो, तो देण्यास जो मनुष्य पात्र असेल त्याजकडून त्याजकडे थकलेल्या जमीन महसुलाच्या बाकीप्रमाणें वसूल करावा. तसा कर ज्या प्रदेशांत बसवावयाचा असेल तो म्युनिसिपल डिस्ट्रिक्ट असल्यास त्या खर्चाची रकम तेथील म्युनिसिपालिटीनें आपल्या म्युनिसिपल फंडांतून देऊन, पोट-कलम (२) अन्वयें सरकार जो हुकुम करील त्या बरहुकुम, तो कर आपण आकारला पाहिजे. त्या खर्चाची आकारणी.

२५. (१) कोणतेहि म्युनिसिपालिटीनें गेल्या शेवटल्या कलमाखालीं अगर ह्या आक्टाच्या दुसऱ्या कोणत्याहि ठरावाअन्वयें आकारलेला प्रत्येक कर, तिनें, तो कर द्यावयास पात्र असलेल्या प्रत्येक इसमाकडून, म्युनिसिपल कराप्रमाणेंच वसूल केला पाहिजे. २४ व्या कलमाखालचे कर व खर्च वसूल करणें.

(२) कलेक्टरानें सदरील कलमाअन्वयें आकारलेला प्रत्येक कर, तो देण्यास पात्र असलेल्या मनुष्याकडून, थकलेल्या जमीन महसुलाच्या बाकीप्रमाणें आपण वसूल केला पाहिजे.

---

## बाब ३ री.

### पोलीस फौजेचें नियमन करणें, तिजवर निर्बंध ठेवणें व तिला कवाईत वगैरे शिकविणें.

२६. सरकारच्या हुकुमांस पात्र राहून, इन्स्पेक्टर जनरल यास, खालीं लिहिलेल्या बाबतींत, ह्या आक्टाशीं अगर त्या त्या वेळीं अमलांत असलेल्या कोणत्याहि इतर कायद्याशीं मेळ बसतील असे कानू अगर हुकुम वेळोवेळीं करण्याचा अखत्यार आहे:— पोलिसाचा कारभार चालविण्यासाठीं कानू करणें.

(अ) पोलीसाच्या रचनेच्या, वर्गीकरणाच्या व त्यांस कवाईत वगैरे शिकविण्याच्या बाबतींत;

(ब) स्वतःच्या हाताखालच्या लोकांनीं पोलिसाची तपासणी करण्याचें नियमन करण्याच्या बाबतींत;

(क) पोलिसास द्यावयाचीं जीं हत्यारें, सामान, कपडे व इतर अवश्य जिन्नस त्यांचा प्रकार व परिमाण ठरविण्याच्या बाबतींत;

(ड) पोलीसच्या कारभाराशीं संबंध असलेल्या कोणत्याहि कारणासाठीं कोणताहि पोलीस फंड उभारण्याच्या, त्याची व्यवस्था ठेवण्याच्या व त्याचें नियमन करण्याच्या बाबतींत;

(ई) कलम १३ रकम (१) यांतील ठराव लागू राहून, पोलिसाची वांटणी, त्याचें स्थलांतर व त्याचें स्थान यांचें नियमन करण्याच्या बाबतींत;

(फ) निरनिराळ्या दर्जांच्या पोलीस अमलदारांच्या कामांचें नियमन करण्याच्या बाबतींत;

(ग) पोलिसानें बातमी व माहिती काढणें व ती कळविणें यांचें नियमन करण्याच्या बाबतींत;

(ह) साधारणतः, पोलिसास आपल्या कामांत तरबेज करण्याच्या व त्यांच्या कामांचा दुरुपयोग अगर अनास्था न होऊं देण्याच्या बाबतींत.

इन्स्पेक्टर जनरलास पत्रकें वगैरे मागविण्याचा अखत्यार आहे.

२७. सरकारच्या कानूंस व हुकुमांस पात्र राहून, इन्स्पेक्टर जनरल आफ् पोलीस यास, आपल्या ताबेदारांकडून, गुन्ह्यांचा बंदोबस्त, व्यवस्था राखणें, व त्यांच्या कामांची बजावणी या संबंधाच्या विषयांबद्दल पाठवितां येतील तितकीं पत्रकें, रिपोर्ट व हकीकती मागण्याचा अखत्यार आहे. सदरील कारणांसाठीं अगर आपणास मिळालेल्या माहितीवरून इन्स्पेक्टर जनरल आफ् पोलीस जे कोणतेहि सामान्य हुकुम करील ते, आणि जे हुकुम सरकार करील ते, त्यानें जिल्ह्याच्या माजिस्ट्रेटास व कमिशनरास कळविले पाहिजेत.

काम करण्यांत निष्काळजीपणा वगैरे याबद्दल पोलीस खात्याच्या द्वारें पोलीस अमलदारांस शिक्षा.

२८. (१) गव्हर्नर इन् कौन्सिल यांस अगर पोटकलम (३) अन्वयें या कारणासाठीं अधिकार दिलेल्या कोणत्याहि अमलदारास, जो कोणताहि पोलीस अमलदार आपलें काम करण्यांत क्रूर, हेकेखोर, सुस्त अगर निष्काळजी किंवा आपलें काम करण्यास अयोग्य आहेसा वाटेल त्यास सस्पेंड करण्याचा, कमी पगारावर घालण्याचा अगर बर्तर्फ करण्याचा, आणि असिस्टंट सुपरिंटेंडेंटाच्या दर्जाखालचा जो कोणताहि पोलीस अमलदार, त्यास सस्पेंड अगर बर्तर्फ करणें जरूर नाहीं अशा नियमभंगाबद्दल अगर गैर वर्तणुकबद्दल अपराधी असेल, त्यास, किंवा जो आपल्या कोणत्याहि कृत्यावरून आपलें काम करण्यास अयोग्य ठरतो त्यास, त्याच्या एका महिन्याच्या पगाराहून जास्त नाहीं इतका दंड करण्याचा, अखत्यार आहे.

ह्या कलमांतील शिक्षा, कलमें ३५, ५७ अगर ५८ याखालच्या गुन्हेगाऱ्यांशिवाय आणखी आहे.

(२) कोणत्याहि पोलीस अमलदारास ह्या कलमाअन्वयें केलेली कोणतीहि शिक्षा, तो अमलदार या आक्टाचें कलम ३६, ५७ अगर ५८ याअन्वयें अगर अमलांत असलेल्या दुसऱ्या कोणत्याहि कायद्याअन्वयें ज्या गुन्हेगारीस पात्र असेल त्या गुन्हेगारीशिवाय आणखी आहे असें समजावें.

इन्स्पेक्टर जनरलाचे व सुपरिंटेंडेंटाचे शिक्षा देण्याचे अधिकार.

(३) पोट-कलम (१) अन्वयें कोणत्याहि इन्स्पेक्टरास शिक्षा करण्याचा इन्स्पेक्टर जनरलास अधिकार आहे. आणि, डिस्ट्रिक्ट सुपरिंटेंडेंटास, त्याच्या हताखालचा जो कोणताहि पोलीस अमलदार इन्स्पेक्टरच्या खालच्या दर्जाचा असेल त्याच्या संबंधानें तितकाच अधिकार आहे; आणि त्याच्या हाताखालच्या कोणत्याहि इन्स्पेक्टराविरुद्ध झालेल्या मोठ्या तक्रारीची चौकशी होई व इन्स्पेक्टर जनरल यांजकडून हुकुम येई तोंपर्यंत त्या इन्स्पेक्टरास सस्पेंड करण्याचा त्या सुपरिंटेंडेंटास अधिकार आहे. परंतु ह्या पोट-कलमाअन्वयें दिलेला कोणताहि अधिकार चालविणें तो नेहमीं, त्या बाबतींत सरकारानें केलेल्या कानूंस व हुकुमांस पात्र राहून चालविला पाहिजे.

शिक्षा करितांना काम कसें चालवावें तें.

२९. जेव्हां कोणताहि अमलदार एकाद्या पोलीस अमलदारास दंड करण्याचा, सस्पेंड करण्याचा, कमी पगारावर घालण्याचा अगर बर्तर्फ करण्याचा हुकुम करील तेव्हां, त्यानें तो हुकुम त्याच्या कारणासहित आणि केलेल्या चौकशीच्या टिपणासहित आपल्या जिल्ह्याच्या भाषेंत अगर इंग्रजी भाषेंत आपल्या सहीनिशीं दफ्तरांत लेखी दाखल केला अगर कराविला पाहिजे.

शिरजोरपणाबद्दल पोलीस खात्याच्याद्वारें शिक्षा.

३०. (१) इन्स्पेक्टर जनरल यास आणि कोणत्याहि डिस्ट्रिक्ट सुपरिंटेंडेंटास, आणि कोणत्याहि जिल्ह्याचा कोणताहि भाग ताब्यांत असलेल्या कोणत्याहि असिस्टंट सुपरिंटेंडेंटास, हेड-कान्स्टेबलच्या दर्जाखालचा जो कोणताहि पोलीस अमलदार आपणासमोर फाजील शिरजोरपणा करील अगर जो आपणाशीं उद्धटपणा करील त्यास तीन दिवसांपेक्षां जास्त नाहींत इतके दिवस कैदेंत ठेवण्याचा अखत्यार आहे.

अशी शिक्षा करितांना काम चालविण्याची रीत.

(२) सदरीं सांगितल्याप्रमाणें कोणत्याहि पोलीस अमलदारास शिक्षा केल्याचा प्रत्येक हुकुम, कलम २९ यांत सांगितल्याप्रमाणें दप्तरीं दाखल केला पाहिजे; आणि डिस्ट्रिक्ट सुपरिंटेंडेंटानें अगर असिस्टंट सुपरिंटेंडेंटानें केलेल्या अशा प्रत्येक हुकुमाची एक प्रत त्यानें आपल्या लगतच्या वरिष्ठ अमलदाराकडे पाठविली पाहिजे.

३१. जो कोणताहि पोलीस अमलदार ज्या प्रदेशाकारितां नेमिलेला असेल अगर ज्या प्रदेशांत त्याची कायदेशीर रीतीनें बदली झाली असेल, तो, त्या प्रदेशांत नेहमीं कामावर असतो असें ह्या आक्टाच्या सर्व कारणांसाठीं समजलें जाईल; आणि, इलाक्याच्या कोणत्याहि एका भागाकारितां नेमिलेला कोणताहि पोलीस अमलदार आणि नेमिलेलें कोणतेहि पोलीस अमलदार अगर पोलीस अमलदारांची मंडळी, यांस, सरकारानें अगर इन्स्पेक्टर जनरलानें तसा हुकुम केला तर, इलाक्याचा ज्या कोणत्याहि इतर भागीं जोंपर्यंत त्याची गरज लागेल त्या भागीं तोंपर्यंत कोणत्याहि वेळीं पोलीसच्या कामावर ठेवण्याचा अख्त्यार आहे.

पोलीस अमलदार नेहमीं कामावर आहेत असें मानिलें पाहिजे; आणि ते इलाक्याच्या कोणत्याहि भागीं कामावर पाठविले जाण्यास पात्र आहेत.

३२ (१) जिल्हा-माजिस्ट्रेटाच्या अगर सरकारच्या परवानगीशिवाय कोणत्याहि पोलीस अमलदारानें व्यापाराचें काम करूं नये, अगर तो ज्या जिल्ह्यांत कामावर असेल त्या जिल्ह्यांतल्या कोणत्याहि जमिनीच्या खरेदींत अगर विक्रींत किंवा व्यापाराच्या कोणत्याहि कामांत मुख्य ह्मणून अगर मुख्त्यार ह्मणून त्यानें कोणत्याहि रीतीनें संबंध ठेवूं नये.

पोलीस अमलदारानें व्यापार करूं नये अगर जमीन विकत घेऊं नये.

(२) असिस्टंट सुपरिंटेंडेंटाच्या खालच्या दर्जाच्या कोणत्याहि पोलीस अमलदारानें, इन्स्पेक्टर जनरलाची लेखी परवानगी घेतल्याशिवाय, पोलीस अमलदार या नात्यानें आपला हुद्दा अगर आपलीं कामें यांखेरीज दुसरा कोणताहि हुद्दा धारण करितां कामास नये अगर कोणत्याहि धंद्याचें अगर नोकरीचें काम चालवितां कामास नये.

परवानगी घेतल्यवाचून असिस्टंट सुपरिंटेंडेंटाच्या खालच्या दर्जाच्या पोलीस अमलदारांनीं इतर काम करूं नये.

(३) पोटकलमें (१) व (२) यांतले मनाईचे ठराव ज्याप्रमाणें पोलीस अमलदार कामावर असतांना त्यांस लागू आहेत त्याचप्रमाणें रजेवर अगर सस्पेंड असतांनाहि लागू राहतील.

पोलीस अमलदार रजेवर अगर सस्पेंड केलेला असतांहि हे मनाईचे ठराव लागू राहतील.

३३. (१) डिस्ट्रिक्ट सुपरिंटेंडेंटाच्या लेखी परवानगीशिवाय अगर तशी परवानगी देण्यास इन्स्पेक्टर जनरलानें अधिकार दिलेल्या इतर पोलीस अमलदाराच्या लेखी परवानगीशिवाय असिस्टंट सुपरिंटेंडेंटाच्या खालच्या दर्जाच्या कोणत्याहि पोलीस अमलदारास आपल्या हुद्याचा राजीनामा देणें असल्यास अगर आपल्या हुद्याच्या कामांतून अंग काढणें असल्यास, त्यानें—

पोलीस अमलदारानें राजीनामा देण्यास कोणत्या शर्ती लागू आहेत.

(अ) तसें करण्याच्या आपल्या इराद्याची लेखी नोटीस डिस्ट्रिक्ट सुपरिंटेंडेंटास दिल्यावर दोन महिने संपत तोंपर्यंत, व

(ब) पोलीस अमलदार या नात्यानें सरकारास अगर कोणत्याहि पोलीस फंडास देणें असलेलें सर्व कर्ज फिटे तोंपर्यंत

तसें करूं नये;

(२) मात्र इतकेंच कीं, असा कोणताहि पोलीस अमलदार, जर, आपण रोगामुळें अगर मानसिक किंवा शारीरिक नालायकतेमुळें पोलिसांत आणखी नोकरी करण्यास अयोग्य असल्याबद्दल सिव्हिल सर्जनच्या सहीचा दाखला हजर करील तर, सदरीं सांगितलेलें कर्ज त्यानें फेडल्यास अगर फेडण्याबद्दल चांगलें तारण दिल्यास राजीनामा देण्यास लागणारी लेखी परवानगी त्यास विलंब न लावितां दिली जाईल.

(३) असा कोणताहि अमलदार जर ह्या कलमांतील ठरावांविरुद्ध राजीनामा देईल अगर आपल्या हुद्याच्या कामांतून अंग काढून घेईल तर तो, डिस्ट्रिक्ट सुपरिंटेंडेंटाच्या हुकुमावरून, त्याची त्यावेळेस येणें असलेल्या पगाराची सगळी बाकी सरकारांत जप्त केली जाण्यास पात्र होईल. पगाराची बाकी सदरहूप्रमाणें सरकारांत जप्त करण्याची शिक्षा, सदरहू प्रकारचा अमलदार कलम ३९ अन्वयें अगर अमलांत असलेल्या इतर कायद्याअन्वयें ज्या गुन्हेगारीस पात्र होतो त्या गुन्हेगारीशिवाय आणखी आहे असें समजावें.

ह्या कलमांतील ठराव मोडणाऱ्या पोलीस अमलदाराचा पगार सरकारांत जमा करण्याचा अख्त्यार आहे.

कामावरून दूर झालेल्या पोलीस अमलदारानें दाखला, हत्यारें इत्यादि हवाली केली पाहिजेत, आणि

३४. (१) जो कोणताहि मनुष्य कोणत्याहि कारणावरून पोलीस अमलदाराच्या कामावरून दूर होईल त्यानें, आपल्या नेमणुकीचा अगर हुद्याचा दाखला आणि त्याच्या हुद्याचें काम चालविण्यासाठीं त्यास दिलेलीं हत्यारें, सामान, कपडे व इतर जरूरीच्या वस्तु, हीं, तीं घेण्यास ज्या पोलीस अमलदारास डिस्ट्रिक्ट सुपरिंटेंडेंटानें अधिकार दिला असेल त्याच्या हवालीं विलंब न लावितां केलीं पाहिजेत.

तीं हवालीं केलीं नाहींत तर तीं झाडा घेण्याच्या वारंटानें धरण्याचा अखत्यार आहे.

(२) सदरीं सांगितल्याप्रमाणें हवालीं न केलेला कोणताहि दाखला, हत्यारें, सामान, कपडे व जरूरीच्या इतर वस्तु, ह्यांचा तीं जेथें ह्मणून असतील तेथें तपास करून तीं धरण्यासाठीं वारंट काढण्याचा कोणत्याहि माजिस्ट्रेटास आणि विशेष कारणांसाठीं ( तीं त्यावेळीं लिहून ठेविलीं पाहिजेत ) कोणत्याहि डिस्ट्रिक्ट सुपरिंटेंडेंटास अखत्यार आहे. याप्रमाणें काढलेलें प्रत्येक वारंट, सन १८८२ चें क्रिमिनल प्रोसीजर कोड याच्या ठरावांवरहुकूम पोलीस अमलदारानें, अगर, वारंट काढणाऱ्या माजिस्ट्रेटानें किंवा डिस्ट्रिक्ट सुपरिंटेंडेंटानें तसा हुकुम केल्यास कोणत्याहि इतर मनुष्यानें बजाविलें पाहिजे.

(३) कोणत्याहि मनुष्यास पुरविलेली जी कोणतीहि वस्तु इन्स्पेक्टर जनरल याच्या हुकुमांवरहुकुम त्या मनुष्याच्या मालकीची झालेली असेल, त्या वस्तूस ह्या कलमांतील कोणताहि ठराव लागू होणार नाहीं असें समजावें.

पोलीस अमलदाराच्या गैरवर्तणुकीबद्दल शिक्षा.

३५. (१) जो कोणताहि पोलीस अमलदार—

(अ) कलम ३२ यांतील कोणत्याहि ठरावाचा भंग करील ; अगर

(ब) भितरेपणा करील; अगर

(क) कलम ३३ याविरुद्ध आपल्या हुद्याचा राजीनामा देईल अगर त्या हुद्याच्या कामांतून आंग काढील; अगर

(ड) आपणास पोलीस अमलदार या नात्यानें पाळिला पाहिजे अगर मानिला पाहिजे अशा आणि ज्याचा भंग अगर अव्हेर करण्याबद्दल अमलांत असलेल्या इतर कोणत्याहि कायद्यांत शिक्षा सांगितली नाहीं अशा कायद्याच्या कोणत्याहि ठरावाचा अगर अशा कोणत्याहि कानूचा अगर हुकुमाचा जाणूनबुजून भंग अगर अव्हेर करील; अगर

(इ) ज्या कर्तव्यभंगाबद्दल अमलांत असलेल्या कोणत्याहि इतर कायद्यांत स्पष्ट शिक्षा सांगितलेली नाहीं, तसा कोणताहि कर्तव्यभंग करील;

त्यास कैदेची शिक्षा केली पाहिजे व ती कैद तीन महिनेपर्यंत ठरविण्याचा अखत्यार आहे, अगर त्यास दंडाची शिक्षा दिली पाहिजे व तो दंड त्या अमलदाराच्या तीन महिन्यांच्या पगाराच्या रकमेपर्यंत ठरविण्याचा अखत्यार आहे, अगर त्यास दोन्ही शिक्षा दिल्या पाहिजेत.

रजा संपतांच कामावर परत येण्यास चुकल्याचा परिणाम.

(२) रजेवर गैरहजर असलेला जो कोणताहि पोलीस अमलदार, वाजवी कारणाशिवाय, ती रजा संपतांच आपण कामावर जाण्यास तयार असल्याबद्दल रिपोर्ट करणार नाहीं, त्यानें, (क) रकमेच्या कारणांसाठीं, ३३ व्या कलमाच्या अर्थाअन्वयें आपल्या हुद्याच्या कामांतून आंग काढिलें आहे असें समजलें जाईल.

हुद्याचा दाखला हवालीं करण्यास चुकल्याचा परिणाम.

३६. कलम ३४ पोट-कलम (१) अन्वयें जो कोणताहि पोलीस अमलदार आपल्या नेमणुकीचा अगर हुद्याचा दाखला अगर इतर कोणतीहि वस्तु हवालीं करण्यास जाणुनबुजून हयगय करील अगर इनकार करील त्यास कैदेची शिक्षा दिली

पाहिजे व ती कैद एक महिनापर्यंत ठरविण्याचा अख्त्यार आहे अगर त्यास दंडाची शिक्षा दिली पाहिजे व तो दंड दोनशें रुपयेपर्यंत ठरविण्याचा अख्त्यार आहे, अगर दोन्ही शिक्षा दिल्या पाहिजेत.

---

## बाब ४ थी. पोलीससंबंधी नियम.

रस्त्याची वहिवाट वगैरे बाबतींत कानू करण्याचा जिल्हा माजिस्ट्रेटास अख्त्यार आहे.

३७. (१) जिल्हा माजिस्ट्रेटास, यासंबंधानें अधिकार असलेल्या म्युनिसिपल अगर इतर अधिकाऱ्यानें केलेल्या हुकुमांस पात्र राहून, आपणास योग्य वाटेल त्या शहरांत अगर इतर जागेंत, वेळोवेळीं, खालीं दिलेल्या बाबतींत कानू अगर हुकूम करण्याचा अख्त्यार आहे:—

(अ) आपणास वाजवी वाटतील ते प्रसंग शिवायकरून, मोडकळीस आलेल्या इमारतींपासून अगर इतर कारणापासून भय असलेले विवक्षित रस्ते अगर इतर जागा कांहीं कालपर्यंत बंद करण्याच्या बाबतींत;

(ब) ज्या इमारती, प्लाटफार्म, व इतर बांधकामें बांधतांना, त्यांची दुरुस्ती करितांना व तीं पाडितांना जाणाऱ्या येणाऱ्यांस, जवळपासच्या लोकांस, अगर इतर लोकांस धोका येण्याचा संभव असेल, त्या इमारती, प्लाटफार्म व इतर बांधकामें बांधीत असतांना दुरुस्त करीत असतांना व पाडीत असतांना मनुष्यांस आणि मालमिळकतीस इजा न पोंचण्याची तजवीज करण्याबद्दल;

(क) कोणताहि हत्ती अगर जंगली किंवा भयंकर जनावर कोणत्याहि रस्त्यांतून अगर रस्यांत दोरीनें देणें, हांकणें, नेणें अगर गाडींतून वगैरे वाहून नेणें यांचें नियमन करण्याबाबद;

(कक) रहदारीस अगर उजेड व हवा अप्रतिबंध रीतीनें येण्याजाण्यास हरकत होई अशा रीतीनें कोणत्याहि रस्त्यांत अगर रस्त्याच्या भागांत कोणतीहि दोरी अगर काठी आडवी टांगण्याची अगर ठेवण्याची किंवा कोणतेंहि बहिर्निसृत अगर बांधकाम करण्याची मनाई करण्याबाबद;

(ड) याकरितां जे वाजवी नियम आपण ठरवील त्यांस अनुसरल्याशिवाय विवक्षित रस्त्यांतल्या घरांतून अगर इमारतींतून बाहेर किंवा त्या घरांत अगर इमारतींत किंवा अशा रस्त्यावरून नरक आणि घाणीचे पदार्थ अगर वस्तु केव्हां नेऊं नयेत आणि रस्त्यांतून अगर विवक्षित रस्त्यांतून गुरें केव्हां नेऊं नयेत याच्या वेळा ठरविण्याबाबद;

(इ) याकरितां जे वाजवी नियम आपण ठरवील त्यांस अनुसरल्याशिवाय, कोणत्याहि रस्त्यांत अथवा इमारतींत अगर कोणत्याहि रस्त्यावर अथवा इमारतीवर अगर कोणत्याहि रस्त्यापासून अथवा इमारतीपासून पन्नास फुटांच्या आंत कोणतेंहि गवत अगर इतर वस्तु पेटविणें अगर जाळणें किंवा आनंदप्रदर्शक अग्नि पेटविणें अगर कोणतेंहि अग्निअस्त्र अगर वाऱ्याची बंदूक मौजेनें सोडणें किंवा दारूकाम सोडणें अगर फेंकणें अगर जाळाचें विमान उडविणें, किंवा कोणताहि खांब अगर इतर वस्तु, त्यावर दिवे अगर प्रकाशाचीं इतर साधनें लावण्यासाठीं, कोणत्याहि रस्त्याच्या बाजूस रोवणें अगर रस्त्यावर आडवीं बसविणें, याची मनाई करण्याबाबद;

(फ) कोणत्याहि रस्त्यांत खाडा खणण्याबाबद, अगर इमारतींचें सामान अगर इतर जिन्नस ठेवण्याबाबद किंवा कोणताहि घोडा अगर इतर जनावर बांधण्याबाबद अगर अटकवून ठेवण्याबाबद जिल्हामाजिस्ट्रेट जे वाजवी नियम करील त्यांस अनुसरल्याशिवाय तसें करण्याची मनाई करण्याबाबद;

(ग) कोणत्याहि रस्त्यांत सांसर्गिक अगर स्पर्शजन्य रोग झालेले लोक अगर जनावरें आणि जनावरांचीं मढीं अगर त्यांचे भाग आणि माणसांचीं प्रेतें ठेवण्याबाबद अगर फिरवण्याबाबद सदरील प्रकारचे जे नियम असतील त्यांस अनुसरल्याशिवाय तसें करण्याची मनाई करण्याबाबद;

(ह) जनावरें मारण्यासाठीं, प्रेतें अगर कातडीं साफ करण्यासाठीं, अपकारक अगर दुर्गंधी पदार्थ टाकण्यासाठीं, आणि शौचास जाण्यासाठीं जागा वेगळ्या राखून ठेवण्याबाबद;

(ज) चालू अगर चालू होईल अशी भीति असलेल्या मनुष्यांच्या अगर जनावरांच्या सातीच्या अगर सांसर्गिक रोगाच्या प्रसंगीं तो रोग नाहींसा करण्यासाठीं अगर त्याचा प्रसार बंद करण्यासाठीं सरकारानें हुकुम केल्याप्रमाणें अगर पसंत केल्याप्रमाणें, घरांचा भोगवटा करणारांनीं आणि त्यांत राहणारांनीं तें घर स्वच्छ ठेवण्याच्या आणि त्यांतल्या रोगबीजाचा नाश करण्याच्या बाबतींत; आणि तो रोग झालेल्या अगर झाला आहे असें वाटत असलेल्या लोकांस अगर जनावरांस वेगळें ठेवून त्यांची व्यवस्था ठेवण्याच्या बाबतींत ;

(के) पाण्याचा कोणताहि उगम, पुरवठा अगर पात्र पूर्णपणें अगर विवक्षित कारणांसाठीं बंद करण्याबद्दल अगर न वापरण्याबद्दल अगर विवक्षित कारणासाठीं त्याचा वापर करण्याबद्दल हुकुम करण्याबाबद, आणि त्या उगमाचा, पुरवठ्याचा अगर पात्राचा, किंवा त्यांतल्या पाण्याचा बिघाड होऊं नये ह्मणून ठराव करण्याबाबद;

(ल) प्रेताची व्यवस्था लावण्याची कोणतीहि जागा, कोणतीहि धर्मशाळा, गांवाची वेस अगर सार्वजनिक चवाठ्याची इतर जागा हिच्या फायद्याचा व सोईचा उपयोग सर्वांस सारखा व योग्य रीतीनें व्हावा यासाठीं आणि तेथें येणाऱ्या लोकांत त्यांच्या वागणुकीच्या संबंधानें बंदोबस्त राखण्यासाठीं तिचा उपयोग कोणत्या वेळीं व कोणत्या रीतीनें करावा याचें नियमन करण्याबाबद;

(लल) नाटकगृहें आणि सार्वजनिक रंजनाच्या अगर जमण्याच्या इतर जागा यांत लोकांच्या येण्याजाण्याचें व तेथें सभ्यपणें व व्यवस्थितपणें काम चालविण्याचें नियमन करण्याबाबद; आणि ज्या काळीं व जागीं लोकांच्या सुरक्षितपणासाठीं आणि सोईसाठीं विशेष कानू करणें माजिस्ट्रेटास अवश्य वाटेल त्या काळीं व जागीं मनुष्यांच्या, जनावरांच्या व वाहनांच्या जाण्यायेण्याचें नियमन करण्याबाबद;

असे कानू प्रसिद्ध करण्याची रीत.

(२) प्रेताची व्यवस्था लावण्याच्या कोणत्याहि जागेचा उपयोग करण्याच्या संबंधानें रकम (ल) अन्वयें करावयाचा प्रत्येक कानू, ज्ञातीच्या रिवाजांकडे आणि कित्येक प्रसंगीं प्रेतांची व्यवस्था लवकर लावण्याच्या अवश्यकतेकडे योग्य लक्ष पुरवून करावा; आणि रकम (क), (ड), (इ), (फ), अगर (ग) याअन्वयें

जिल्ह्याच्या माजिस्ट्रेटानें केलेला प्रत्येक कानू अगर हुकुम, त्याची एक प्रत, त्या जिल्ह्याच्या भाषेंत, तो कानू अगर हुकुम ज्या शहरीं अगर जागीं अमलांत यावयाचा असेल त्या शहराच्या अगर जागेच्या चावडींत किंवा दुसऱ्या एखाद्या सार्वजनिक इमारतींत लावून, प्रसिद्ध केला पाहिजे, आणि, रकम (अ), (ब), (ज), (के) अगर (ल) या अन्वयें केलेल्या प्रत्येक कानूची अगर हुकुमाची एक प्रत, त्या जिल्ह्याच्या भाषेंत, तो कानू अगर हुकुम ज्या इमारतीस, बांधकामास, कामास, अगर जागेस विशेषत: लागू असेल त्या इमारतीच्या, बांधकामाच्या, कामाच्या अगर जागेच्या जवळ सर्वांस दिसेल अशा जागीं लावून ठेविली पाहिजे; आणि त्या कानूशीं अगर हुकुमांशीं संबंध असलेल्या सर्व मनुष्यांनीं त्याप्रमाणें वागलें पाहिजे.

(३) या कलमाच्या (१) रकमेच्या (ज) पोट-रकमेअन्वयें केलेला प्रत्येक कानू लागलाच सरकारास कळविला पाहिजे, आणि तो, पंधरा दिवसांपेक्षां जास्त वेळ अमलांत राहणार नाहीं; परंतु सरकारानें ती मुदत वाढविल्यास सरकार हुकुम करी तोंपर्यंत तो अमलांत ठेविला जाईल.

*जिल्हा माजिस्ट्रेटास, सुरुंग लावण्याच्या व खणण्याच्या संबंधाचे कानू करण्याचा अखत्यार आहे.*

३८. प्रत्येक जिल्हा माजिस्ट्रेटास, आपल्या जिल्ह्यांतील कोणत्याहि शहरांतल्या अगर गांवांतल्या कोणत्याहि रस्त्यांत अगर रस्त्याजवळ खडकांस सुरुंग लावण्याच्या बाबतींत अगर खणण्याच्या बाबतींत वेळोंवेळीं कानू करण्याचा आणि त्या कानूंत अशा कामांसाठीं परवाने देण्याबद्दल ठराव करण्याचा अखत्यार आहे.

*छिनालवाडे बंद करणें.*

३९. कोणत्याहि जिल्ह्यांतील अगर पोट-तुकडींतील ज्या शहरास अगर गांवास गव्हर्नर इन् कौन्सिल यांनीं मुंबई सरकारी गॅझेटांत जाहिरनामा देऊन हें कलम लागू केलें असेल, त्या शहरांतलें अगर गांवांतलें अमुक घर छिनालवाड्याप्रमाणें किंवा कसबिणी अगर कोणत्याहि प्रकारचे बेबंद लोक यांच्या बिऱ्हाडाप्रमाणें अगर अड्ड्याप्रमाणें वापरण्यांत येत असून त्यापासून जवळपासच्या प्रतिष्ठित लोकांस त्रास होत असतो अशी त्या जिल्ह्याच्या अगर पोट-तुकडीच्या माजिस्ट्रेटाकडे तक्रार केली असतां त्या तक्रारीस जबाब देण्यासाठीं त्या घराच्या मालकास अगर भाडेकऱ्यास बोलावण्याचा त्या माजिस्ट्रेटास अखत्यार आहे, आणि तें घर सदरीं सांगितल्याप्रमाणें वापरलें जात आहे अशी त्या माजिस्ट्रेटाची खात्री झाल्यावर, त्या घराच्या मालकास अगर भाडेकऱ्यास वाजवी मुदतीच्या आंत त्या घराचा तसा उपयोग करण्याचें बंद करण्याबद्दल हुकुम करण्याचा त्या माजिस्ट्रेटास अखत्यार आहे; ती वाजवी मुदत त्या हुकुमांत निर्दिष्ट केली पाहिजे.

*अव्यवस्था न होऊं देण्याकरितां माजिस्ट्रेटांनीं हुकुम करणें.*

४०. (१) जिल्ह्याच्या माजिस्ट्रेटास अगर तो गैरहजर असल्यास कोणत्याहि शहरांत अगर गांवांत हुकुमांत असलेल्या व त्यांत अगर त्याच्या आसपास हजर असलेल्या माजिस्ट्रेटांपैकीं श्रेष्ठ दर्जाच्या माजिस्ट्रेटास जरूर दिसेल त्या वेळीं व तितक्या वेळपर्यंत, सार्वजनिक रीतीनें अगर व्यक्तीस उद्देशून केलेल्या जाहिरनाम्याच्या द्वारें त्या शहरांत अगर गांवांत किंवा त्या शहराजवळ अगर गांवाजवळ नीति अगर सभ्यता यांस विरुद्ध, किंवा त्या माजिस्ट्रेटाच्या मतें, ज्यांपासून निरनिराळ्या जातींमध्यें धर्मवैर अगर द्वेष पेटण्याचा संभव आहे अशीं, किंवा ज्यांपासून कोणताहि अपराध करण्यास अगर सार्वजनिक शांतता मोडण्यास अगर कायद्यास हरकत आणण्यास अगर त्या कायद्याचा अगर कायदेशीर अधिकाऱ्याच्या हुकुमाचा तिरस्कार करण्यास लोक चिथतील अशीं, शस्त्रें, सोटे, अगर इतर हत्यारें धारण करणें, दगड अगर इतर अस्त्रें अगर अस्त्रें सोडावयाचीं अगर फेंकावयाचीं यंत्रें अगर साधनें नेणें, जमा करणें आणि तयार करणें, मनुष्यें अगर प्रेतें अगर त्यांच्या प्रतिमा दाखविणें, सार्वजनिक रीतीनें आरोळ्या मारणें, गाणीं गाणें, भाषणें करणें, हावभाव करणें अगर सोंगें आणणें

आणि अशीं चित्रें, चिन्हें, प्लाकार्ड अगर इतर जिन्नस किंवा वस्तु, हीं तयार करणें, त्यांचें प्रदर्शन करणें अगर तीं लोकांस वांटणें यांचीं मनाई करण्याचा अखत्यार आहे.

(२) कोणत्याहि एकाद्या शहरांत अगर गांवांत अगर त्याच्या जवळ सारख्या दर्जाचे दोन अगर अधिक माजिस्ट्रेट असतील, आणि त्यांची त्या जागीं हुकुमत असेल, तेव्हां त्यांपैकीं कोणत्याहि एकास सदरींप्रमाणें मनाईचा हुकुम करण्याचा अखत्यार आहे.

गर्दी अगर स्वस्थतेचा मोठा भंग बंद करण्यासाठीं जिल्हा माजिस्ट्रेटानें हुकुम करणें.

४० अ. जी गर्दी अगर स्वस्थतेचा मोठा भंग लवकरच होण्यासारखा असेल अगर होईल अशी भीति असेल तो न होऊं देण्यासाठीं कोणतीहि इमारत अगर जागा तात्पुरती बंद करण्याचा अगर आपल्या ताब्यांत घेण्याचा आणि त्यांत कोणत्याहि अगर विवक्षित मनुष्यांस न येऊं देण्याचा अगर आपणांस योग्य वाटतील त्या मनुष्यांस योग्य वाटतील त्या शर्तीवर मात्र येऊं देण्याचा जिल्हा-माजिस्ट्रेटास अधिकार आहे. या कलमाअन्वयें आपणांस दिलेला अधिकार चालवून तो माजिस्ट्रेट जो हुकुम करून प्रसिद्ध करील त्या हुकुमाअन्वयें संबंध असलेल्या सर्व मनुष्यांनीं वागलें पाहिजे.

धर्मसंबंधी संस्कार वगैरेच्या जागीं व्यवस्था राखण्याबद्दल जिल्हा माजिस्ट्रेटानें हुकुम काढणें.

४० ब. (१) धर्मसंबंधीं अगर संस्कारसंबंधी अगर सनदी मंडळीसंबंधी उत्सव, प्रदर्शन अगर मेळा कोणत्याहि रस्त्यांत होत असून अगर करण्याचा इरादा असून, त्या उत्सवाच्या वगैरे संबंधानें, अगर तो चालवावयाच्या संबंधानें अगर त्यांत सामील होण्याच्या संबंधानें वाद अगर तंटा आहे व त्यामुळें स्वस्थतेचा मोठा भंग होण्याचा संभव आहे असें, जिल्हा-माजिस्ट्रेटास दिसून आल्यास, त्यास, त्या संबंधाच्या पक्षांचे व मनुष्यांचे स्पष्ट कायदेशीर हक्क व नेहमींचा सांप्रदाय यांजकडे लक्ष देऊन, त्या संबंधाच्या लोकांनीं परस्परांशीं व इतर लोकांशीं कसें वागावें याबद्दल त्या प्रसंगास जे हुकुम करणें अवश्य व वाजवी असें वाटेल, ते हुकुम करण्याचा अखत्यार आहे. असा कोणताहि हुकुम, तो ज्या शहरीं अगर जागीं अमलांत यावयाचा असेल त्या शहरीं अगर जागीं प्रसिद्ध केला पाहिजे, आणि संबंध असलेल्या सर्व लोकांनीं तो मानिला पाहिजे.

असे हुकुम दिवाणी कोर्टाच्या हुकुमनाम्यास, ताकिदीस, अगर हुकुमास पात्र आहेत.

(२) गेल्या शेवटल्या पोट-कलमाअन्वयें केलेला कोणताहि हुकुम, हुकुमत असलेलें दिवाणी कोर्ट, कोणत्याहि मनुष्यानें दावा अगर अर्ज केल्यावरून, तो हुकुम ज्या कोणत्याहि मनुष्यास लागू असेल त्याच्या हक्कांसंबंधानें व कर्तव्यांसंबंधानें जो कोणताहि हुकुमनामा, ताकीद, अगर हुकुम करील, त्यास पात्र राहील असें समजावें.

जत्रांच्या वगैरे ठिकाणीं रोगाची सांत न उठूं देण्याबद्दल विशेष तजवीज करण्याचा जिल्हा माजिस्ट्रेटास अखत्यार आहे.

४१. (१) कोणत्याहि जिल्ह्याच्या माजिस्ट्रेटास जर असें दिसून येईल कीं, आपल्या जिल्ह्यांतील अमुक जागीं, जत्रेमुळें, यात्रेमुळें, अगर तशा दुसऱ्या एकाद्या गोष्टीमुळें मनुष्यांचे मोठे समुदाय जमले असून अगर जमण्याचा संभव असून त्या जागीं कोणतीहि रोगाची सांत उठली आहे अगर उठण्याचा संभव आहे, तर ती सांत उठूं न देण्यास अगर तिचा फैलाव न होऊं देण्यास आपणांस जरूर वाटतील त्या विशेष तजविजी करण्याचा आणि त्या जागेच्या रहिवाशांनीं, आणि तेथें असलेल्या लोकांनीं अगर त्या जागीं जात असलेल्या अगर जाण्याचा इरादा असलेल्या लोकांनीं किंवा तेथून परत जात असलेल्या अगर परत जाण्याचा इरादा असलेल्या लोकांनीं पाळावयाचे असे नियम करून ते सार्वजनिक नोटिशीच्या द्वारें लोकांस कळविण्याचा त्या माजिस्ट्रेटास अखत्यार आहे.

अशा प्रसंगीं फी बसविणें.

(२) सरकारच्या हुकुमांस पात्र राहून, जिल्हा माजिस्ट्रेटास अगर जिल्हा माजिस्ट्रेटाच्या हुकुमावरून कलेक्टरास, खालीं लिहिल्याप्रमाणें करण्याचा कायद्यावरून अधिकार आहे:—

(अ) जमावाच्या जागीं व जवळपास आरोग्यरक्षणासाठीं व बंदोबस्त राखण्याची व्यवस्था करण्यासाठीं लागेल त्या खर्चाची तजवीज करितां येईल अशी वाजवी फी, पोट-कलम (१) याखालीं येणाऱ्या मनुष्यांवर बसवून ती वसूल करण्याचा अधिकार आहे.

(ब) जमावाची जागा कोणत्याहि म्युनिसिपालिटीच्या हद्दींत असेल तेव्हां, सदरील कारणासाठीं ज्या रकमा लागतील त्या त्या म्युनिसिपालिटीकडून वसूल करण्याचा अखत्यार आहे.

मनुष्यांच्या टोळ्या अगर मंडळ्या मोडून टाकणें.

४२. कोणत्याहि जिल्ह्याच्या माजिस्ट्रेटास अगर कोणत्याहि पोट-तुकडीच्या माजिस्ट्रेटास, त्या जिल्ह्यांत मनुष्यांची कोणतीहि टोळी अगर मंडळी फिरत असल्यामुळें अगर तळ देऊन राहिल्यामुळें त्या टोळीचा अगर मंडळीचा अगर तींतील मनुष्यांचा बेकायदेशीर रीतीनें वागण्याचा इरादा असल्याबद्दल भय अगर भीति उत्पन्न झाली आहे अगर होण्याचा संभव आहे अगर वाजवी संशय उत्पन्न झाला आहे अगर उत्पन्न होण्याचा संभव आहे असें दिसून येईल तेव्हां, त्या टोळींतल्या अगर मंडळींतल्या लोकांनीं दंगा अगर भीति उत्पन्न न होण्यास जसें वागणें अवश्य असेल तसें वागण्याबद्दल अगर ती टोळी अगर मंडळी मोडून तींतील प्रत्येक मनुष्यानें अशा माजिस्ट्रेटानें सांगितलेल्या जागीं सांगितलेल्या रस्त्यानें जाण्याबद्दल त्या टोळीचे अगर मंडळीचे जे पुढारी अगर मुख्य ह्मणून दिसत असतील त्यांच्या नांवानें जाहिरनामा काढून हुकुम करण्याचा व तो जाहिरनामा ढोलकें वाजवून अगर आपणांस योग्य वाटेल त्या इतर रीतीनें प्रसिद्ध करण्याचा त्या माजिस्ट्रेटास अखत्यार आहे.

रंजनाच्या सार्वजनिक जागा व जाहीरसभा यांतल्या अव्यवस्थेबद्दल वगैरे पोलीसानें बंदोबस्त केला पाहिजे.

४३. (१) जेथें येण्यास लोकांस आमंत्रण किंवा मोकळीक असेल, अशा रंजनाच्या कोणत्याहि सार्वजनिक जागीं अगर अशा कोणत्याहि मेळ्यांत अगर सभेंत मोठी अव्यवस्था अगर कायद्याचा भंग न होऊं देण्याकरितां, अगर जमलेल्या मंडळीवर येऊन ठेपलेल्या उघड व प्रत्यक्ष भयाचा प्रतीकार करण्याकरितां, ज्या शहरीं अगर गांवीं ती रंजनाची जागा असेल अगर तो मेळा अगर सभा भरावयाची असेल त्या शहरांत अगर गांवांत हजर असलेल्या कान्स्टेबलहून वरच्या दर्जातील वरिष्ठ पोलीस अमलदारास, कायद्यावरून केलेल्या कानू व हुकुम लागू राहून, त्या रंजनाच्या जागीं अगर मेळ्यांत अगर सभेंत लोकांस येण्याच्या रीतीच्या संबंधानें आणि तेथें चालवावयाचें काम शांतपणें व कायदेशीर रीतीनें चालविण्यांत यावें यासाठीं आपणास जरूर वाटतील ते वाजवी हुकुम करण्याचा अखत्यार आहे; आणि असा प्रत्येक वाजवी हुकुम सर्व मनुष्यांनीं मान्य केला पाहिजे.

अशा जागीं व सभांत येण्याजाण्याची पोलिसास पूर्ण मोकळीक असली पाहिजे.

(२) पोट-कलम (१) यांतील ठरावांचा आणि त्या पोट-कलमाअन्वयें केलेल्या कोणत्याहि हुकुमाचा अमल चालविण्यासाठीं रंजनाच्या, मेळ्याच्या अगर सभेच्या अशा प्रत्येक जागीं येण्याजाण्याची पोलिसास पूर्ण मोकळीक असली पाहिजे.

सार्वजनिक रस्त्यांवर जमलेल्या मंडळ्यांचें वगैरे पोलिसानें नियमन करावें.

४४. (१) कोणताहि माजिस्ट्रेट अगर वाजवी रीतीनें या संबंधाचे अधिकार दिलेला इतर अधिकारी कोणत्याहि वेळीं कायदेशीरपणें करील त्या कोणत्याहि कानू अगर हुकुमास पात्र राहून, डिस्ट्रिक्ट सुपरिंटेंडेंटास अगर कोणत्याहि असिस्टंट सुपरिंटेंडेंटास,

(अ) रस्त्यांवरच्या अगर रस्त्यांतून जाणाऱ्या मंडळ्यांच्या, मिरवणुकींच्या आणि जमून जाणाऱ्या लोकांच्या अगर मेळ्यांच्या वर्तनाविषयीं कानू व हुकुम करण्याचा, आणि, मिरवणुकींच्या बाबतींत त्यांनीं कोणकोणत्या रस्त्यानें कोणत्या क्रमानें, आणि कोणत्या वेळीं जावें हें ठरविण्याचा अखत्यार आहे;

(त्र) रस्त्यांत अगर रस्त्याजवळ वाद्यें, ढोलकीं, डफ अगर इतर वाद्यें वाजविणें आणि शिंगें अगर इतर कर्कश वाद्यें फुंकणें किंवा वाजविणें यांचें, परवाने देऊन अगर इतर रीतीनें नियमन करण्याचा आणि त्यांवर निर्बंध ठेवण्याचा अख्त्यार आहे;

(क) कोणत्याहि माजिस्ट्रेटानें या आक्टाच्या ३७–४२ यां कलमांअन्वयें केलेल्या कोणत्याहि हुकुमाखालचे व त्या हुकुमास पुष्टि आणणारे असे वाजवी हुकुम करण्याचा अख्त्यार आहे.

असे कानू व हुकुम प्रसिद्ध करण्याची रीत.

(२) या कलमाअन्वयें केलेला प्रत्येक कानू व हुकुम, तो ज्या जागीं अमलांत यावयाचा असेल त्या जागेंत अगर जागेजवळ प्रसिद्ध केला पाहिजे, आणि त्यांशीं संबंध असलेल्या सर्व लोकांनीं त्यावरहुकुम वागलें पाहिजे.

कुत्र्यांच्या संबंधानें ठराव.

४९. (१) डिस्ट्रिक्ट सुपरिंटेंडेंटास, जाहीर नोटीस देऊन असा हुकुम करण्याचा अधिकार आहे कीं, बरोबर कोणी मनुष्य नसलेला असा जो कोणताहि कुत्रा रस्त्यांत असेल, त्यास श्वासोच्छ्वास करण्यास व पाणी पिण्यास हरकत न पडतां त्याच्या चावण्याचा पूर्णपणें बंदोबस्त होईल असें मुसकें घातलेलें पाहिजे; आणि असा हुकुम अमलांत असतांना यापुढें पोट-कलम (२) यांत ठरविलें आहे ते प्रसंग शिवाय करून इतर प्रसंगीं, जो कोणताहि कुत्रा आपल्या धन्याच्या जागेबाहेर कोणत्याहि जागीं मोकळा सांपडेल त्याचा नाश करण्याचा अगर त्याचा धनी त्यावर दावा सांगे तोंपर्यंत, त्यास योग्य मुसकें घाली तोंपर्यंत आणि त्याचा ठेवण्याचा सर्व खर्च देई तोंपर्यंत, त्यास कबज्यांत घेऊन अडकवून ठेवण्याचा पोलिसास अख्त्यार आहे.

पोलिसानें कुत्र्याचा नाश केव्हां करावा व ते केव्हा विकावे.

(२) गळ्यांत मालकाचे नांवाचा पट्टा असलेल्या कोणत्याहि कुत्र्याचा, तो पिसाळलेला असेल तो प्रसंग खेरीज करून इतर प्रसंगीं, धन्यानें त्यावर आपला हक्क सांगून त्याला ठेवण्याचा सर्व खर्च दिल्याशिवाय तो पुरे तीन दिवस पोलिसाच्या ताब्यांत राही तोंपर्यंत, पोलिसानें नाश करूं नये; परंतु जो कुत्रा सदरील मुदतीपर्यंत पोलिसाच्या ताब्यांत राहून ज्यावर त्याचा धनी त्या मुदतींत हक्क सांगणार नाहीं अगर सदरील खर्च देणार नाहीं, त्या कुत्र्यास विकण्याचा अगर त्याचा नाश करण्याचा पोलिसास अख्त्यार आहे.

ज्यावर धन्याचा पत्ता लिहिला आहे असा पट्टा असलेल्या कुत्र्याबाबद ठराव.

(३) पोलिसानें कबज्यांत घेतलेल्या कोणत्याहि कुत्र्याच्या गळ्यांत पट्टा असून त्यावर जर कोणत्याहि मनुष्याचा पत्ता लिहिलेला असला, तर, तो कुत्रा कबज्यांत असल्याबद्दल एक पत्र लागलेंच पोष्टानें त्या पत्त्यावर पाठविलें पाहिजे.

डिस्ट्रिक्ट सुपरिंटेंडेंटानें आणि जिल्हा माजिस्ट्रेटांनीं ह्या बाबीखालचे अधिकार अनुक्रमें डिस्ट्रिक्ट माजिस्ट्रेटाच्या व सरकारच्या निर्बंधास पात्र राहून चालविले पाहिजेत.

४६. ह्या बाबीअन्वयें डिस्ट्रिक्ट सुपरिंटेंडेंटास अगर त्याच्या हाताखालच्या कोणत्याहि अमलदारास दिलेला प्रत्येक अधिकार जिल्हा माजिस्ट्रेटाच्या हुकुमांस पात्र राहून चालविला पाहिजे, आणि जिल्हा माजिस्ट्रेटानें ह्या बाबीखालीं केलेले सर्व कानू नियम, व हुकुम कलम १३ (२) यांतील ठरावांस पात्र राहातील असें समजावें.

---

## बाब ५ वी.

### पोलिसाचे बजावणीचे अधिकार व त्याचीं कामें.

पोलीस अमलदाराचीं हुद्याचीं कामें.

४७. (१) प्रत्येक पोलीस अमलदारानें--

(अ) त्यास योग्य अधिकाऱ्यानें कायदेशीरपणें दिलेलें प्रत्येक वारंट अगर इतर हुकुम तात्काळ मानून बजाविलें पाहिजे;

(च) आपणास करवेल तितका प्रयत्न करून, काग्निझेबल गुन्हे झाल्याबद्दल अगर तसे गुन्हे करण्याच्या इराद्याबद्दल बातमी मिळविली पाहिजे, आणि कायद्यास व आपल्या वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून झालेल्या हुकुमांस अनुसरून, ज्या खबरेच्या योगानें व इतर तजविजींच्या योगानें गुन्हेगार इन्साफास आणितां येतील अगर गुन्ह्यांचा प्रतिबंध करतां येईल तशी खबर दिली पाहिजे व तशा इतर तजविजी केल्या पाहिजेत;

(छ) आपणास करवेल तितका प्रयत्न करून सार्वजनिक पीडा करण्याची बंदी केली पाहिजे;

(ज) ज्या इसमांस धरण्याचा त्यास कायद्यावरून अधिकार असेल आणि ज्यांस धरण्यास पुरी सबब असेल त्या सर्वांस धरलें पाहिजे;

(झ) दुसरा कोणताहि पोलीस अमलदार आपलें काम करतेवेळीं बोलावील तेव्हां अगर, त्यास मदत लागेल तेव्हां, कायदेशीर व वाजवी रीतीनें त्यास मदत केली पाहिजे;

(ट) विवक्षित काळीं अमलांत असलेल्या महसुलाबाबतच्या, कोणत्याहि कायद्यांत अगर इतर कायद्यांत आपणास नेमून दिलेलीं कामें केलीं पाहिजेत.

(२) सरकारानें अगर कायद्यावरून अधिकार दिलेल्या कोणत्याहि मनुष्यानें केलेले कानू व हुकुम लागू राहून, प्रत्येक पोलीस अमलदारास सदरील कारणांपैकीं कोणत्याहि कारणासाठीं, लोकांच्या कोणत्याहि जाण्यायेण्याच्या जागेंत, आणि कोणत्याहि जागेचा दारू विकण्याच्या दुकानाप्रमाणें अगर कैफी पदार्थ विकण्याच्या दुकानाप्रमाणें, अगर बेबंद किंवा बदमाष लोकांच्या अड्ड्याच्या ठिकाणाप्रमाणें उपयोग होत असतो असें मानण्यास त्यास कारण असेल त्या ठिकाणांत वारंटाशिवाय शिरून तीं तपासण्याचा अखत्यार आहे. लोकांच्या जाण्यायेण्याच्या जागांत शिरण्याचा अधिकार.

(३) कोणत्याहि रस्त्यांत अगर लोकांच्या जाण्यायेण्याच्या कोणत्याहि जागेंत कोणत्याहि मनुष्याच्या कबज्यांत कोणतीहि वस्तु असेल अगर आहे असें दिसेल आणि ती चोरलेली आहे असें कोणत्याहि पोलीस अमलदारास खरोखर वाटेल तेव्हां त्या पोलीस अमलदारास, तिच्यासाठीं झाडा घेण्याचा, ती तपासण्याचा आणि ती कोठून आली तें सांगण्याबद्दल हुकुम करण्याचा अखत्यार आहे; आणि कबज्यांत असलेल्या मनुष्यानें सांगितलेली हकीकत उघडपणें खोटी किंवा संशयाची असेल तेव्हां ती वस्तु अटकावून ठेवून घडलेली गोष्ट माजिस्ट्रेटास कळविण्याचा त्या पोलीस अमलदारास अधिकार आहे; आणि नंतर माजिस्ट्रेटानें क्रिमिनल प्रोसीजरचीं कलमें ५२३ व ५२५ याअन्वयें अगर अमलांत असलेल्या इतर कायद्याअन्वयें काम चालविलें पाहिजे. चोरलेल्या अगर चोरलेली आहे अशी शंका असलेल्या मिळकतीच्या कबज्याबाबद ठराव.

४८. खालीं लिहिल्याप्रमाणें करणें हें प्रत्येक पोलीस अमलदाराचें कर्तव्य आहे असें समजावें:— लोकांच्या संबंधाचीं पोलीस अमलदाराचीं कामें.

(अ) रस्त्यांत शक्तिहीन अगर पराधीन मनुष्यांस करवेल तितकी प्रत्येक प्रकारची मदत करणें, आणि कैफ आलेल्या मनुष्यांस व वेडे लोक जे इकडे तिकडे फिरत असून ज्यांपासून धोका होण्याचा संभव असेल अगर जे आपणांस सांभाळण्यास असमर्थ असतील त्यांस आपल्या ताब्यांत घेणें;

(व) धरलेला अगर अटकेंत ठेवलेला कोणताहि मनुष्य जखमी अगर आजारी असल्यास त्याकरितां जरूर असेल ती मदत मिळविण्यासाठीं तत्काळ तजवीज करणें आणि अशा मनुष्यावर पाहरा करितांना अगर त्यास एका जागेहून दुसऱ्या जागीं नेतांना त्याच्या अवस्थेकडे योग्य लक्ष पोंचविणें;

(क) जो कोणताहि मनुष्य धरलेला अगर अटकेंत ठेविलेला असेल त्याला योग्य खाणें देण्याबद्दल तजवीज करणें;

(ड) झाडे घेतांना निष्कारण दांडगाई न करणें व विनाकारण त्रास न देणें;

(ई) स्त्रिया व मुलें यांशीं वागतांना कडक मर्यादेनें व वाजवी सौम्यपणानें वागणें;

(फ) आगीनें तोटा अगर नुकसान न होऊं देण्याबद्दल हरप्रयत्न करणें;

(ग) सार्वजनिक अपघात अगर संकट निवारण्याकरितां हरप्रयत्न करणें.

४९. (१) खालीं लिहिलेलें काम करणें पोलीस अमलदाराचें काम आहे:—

पोलिसानें रस्त्यांतल्या रहदारीचें वगैरे नियमन करणें; आणि

(अ) रस्त्यांतल्या रहदारीचें नियमन करणें व सिजवर निर्बंध ठेवणें, रस्त्यांत अडथळे न येऊं देणें आणि, आपणास करवेल तितका प्रयत्न करून, रस्त्यांतल्या अगर रस्त्यांजवळच्या लोकांनीं मानण्यासाठीं ह्या आक्टाअन्वयें अगर अमलांत असलेल्या इतर कोणत्याहि कायद्याअन्वयें केलेल्या कोणत्याहि कानूचा अगर हुकुमाचा भंग न होऊं देणें;

रस्त्यांत आणि इतर सार्वजनिक जागांत बंदोबस्त ठेवणें; आणि

(ब) रस्त्यांत आणि स्नानाच्या, धुण्याच्या आणि उताराच्या सार्वजनिक जागा, जत्रा, देवळें आणि लोक जाण्यायेण्याच्या इतर सर्व जागा यांत आणि यांच्या आसपास आणि सार्वजनिक ईश्वरभक्तीच्या वेळीं, सार्वजनिक ईश्वरभक्तीच्या जागांच्या आसपास, बंदोबस्त ठेवणे;

सार्वजनिक जागांत जाण्यायेण्याचें नियमन करणें.

(क) स्नानाच्या, धुण्याच्या आणि उताराच्या सार्वजनिक जागीं लोकांच्या जाण्यायेण्याचें नियमन करणें, त्या जागीं आणि सार्वजनिक तरींत जास्त गर्दी न होऊं देणें, आणि, आपणास करवेल तितका प्रयत्न करून, अशा कोणत्याहि जागीं अगर तरींत लोकांनीं मानण्यासाठीं कायद्याअन्वयें केलेल्या कोणत्याहि कानूचा अगर हुकुमाचा भंग न होऊं देणें.

पोलिसाचे वाजवी हुकुम लोकांनीं मानिले पाहिजेत.

(२) सदरील कामापैकीं कोणतेंहि काम करितांना कोणत्याहि पोलीस अमलदारानें केलेले वाजवी हुकुम सर्व मनुष्यांनीं मानिले पाहिजेत.

जाणूनबुजून हुकुम मोडणाऱ्या मनुष्यांस तसें करण्यास अटकावण्याचा अगर हाकून देण्याचा पोलीस अमलदारास अख्त्यार आहे.

(३) सदरील प्रकारचा कोणताहि हुकुम मानण्यास विरोध करणाऱ्या अगर इनकार करणाऱ्या अगर चुकणाऱ्या कोणत्याहि मनुष्यास अटकावण्याचा अगर हांकून देण्याचा आणि अशा कोणत्याहि मनुष्यास कोणत्याहि माजिस्ट्रेटापुढें नेण्याचा किंवा, क्षुल्लक बाबतींत, कारण संपल्यानंतर त्यास सोडून देण्याचा पोलीस अमलदारास अख्त्यार आहे.

कलम ४०, ४० अ अगर ४० ब अन्वयें केलेले हुकुम बजावणें.

५०. कलम ४० अन्वयें कोणताहि जाहिरनामा योग्यरीतीनें काढल्यानंतर अगर कलम ४० अ किंवा ४० ब अन्वयें कोणताहि हुकुम केल्यानंतर जो कोणताहि मनुष्य त्या जाहिरनाम्याविरुद्ध अगर हुकुमाविरुद्ध वागत असेल अगर वागणार असे-

ल, त्यास तसें न वागण्यास अगर तसें वागण्याचें वर्जिण्यास हुकुम करण्याचा आणि त्या मनुष्यानें तसें करण्याचा इनकार केल्यास अगर तो हुकुम न मानिल्यास त्यास धरण्याचा कोणत्याहि माजिस्ट्रेटास अगर पोलीस अमलदारास कायद्यारून अधिकार आहे. आणि अशा माजिस्ट्रेटास अगर पोलीस अमलदारास, अशा जाहिरनाम्याविरुद्ध ज्या वस्तूचा अगर जिन्नसेचा उपयोग करण्यांत येईल अगर उपयोग केला जाणार असेल ती वस्तु अगर जिन्नस ताब्यांत घेण्याचाहि अखत्यार आहे, आणि त्या जागीं ज्या माजिस्ट्रेटाची हुकुमत असेल त्या माजिस्ट्रेटाच्या हुकुमाप्रमाणें त्या ताब्यांत घेतलेल्या वस्तूची व्यवस्था केली जाईल

९०. जिल्ह्याच्या माजिस्ट्रेटानें कलम ४१ अन्वयें अगर जिल्ह्याच्या माजिस्ट्रेटानें किंवा एखाद्या पोट-तुकडीच्या माजिस्ट्रेटानें कलम ४२ अन्वयें केलेला प्रत्येक नियम व जाहिरनामा लोकांकडून योग्य रीतीनें मानिला जातो कीं नाहीं तें पाहणें, जे लोक अज्ञानामुळें तो मानण्यास चुकत असतील त्यांस सावध करणें आणि जो कोणताहि मनुष्य जाणूनबुजून तो मानणार नाहीं त्यास धरणें हें पोलिसाचें काम आहे असें समजावें.

कलम ४१ अगर कलम ४२ अन्वयें केलेले हुकुम मानिले जातील अशी पोलिसानें तजवीज करावी.

९१. अ. गुरांच्या कोंडवाड्याबाबद आक्ट याचे ठराव लागू होणारें जें कोणतेंहि जनावर कोणत्याहि रस्त्यांत भटकतांना आढळून येईल तें ताब्यांत घेऊन अगदीं जवळच्या कोंडवाड्यांत घेऊन जाण्याचा अगर पाठविण्याच्या कोणत्याहि पोलीस अमलदारास अखत्यार आहे; आणि यानंतर त्या जनावराच्या मालकास त्या आक्टाचे ठराव लागू होतील.

पोलीस अमलदारानें भटकणारीं गुरें ताब्यांत घ्यावीं.

९२. पोलिसास सांपडलेली अगर त्याच्या हवालीं केलेली सर्व बेवारसी मिळकत पोलिसानें तात्पुरती आपल्या ताब्यांत ठेविली पाहिजे, आणि ती ज्या शहरांत अगर गांवांत सांपडली असेल त्या शहरास अगर गांवास पोलीस पाटील असल्यास त्या पाटिलाच्या हवालीं ती सर्व करून त्याची तिच्याबद्दल पावती घेतली पाहिजे, आणि तो पाटील ज्या माजिस्ट्रेटाचा ताबेदार असेल त्याकडे त्या पाटलानें ती पाठविली पाहिजे. त्या शहरास किंवा गांवास पोलीस पाटील नसल्यास, त्या जिल्ह्याचा माजिस्ट्रेट ज्या माजिस्ट्रेटाची या बाबतींत वेळोवेळीं नेमणूक करील, त्या माजिस्ट्रेटाकडे पोलिसानें रिपोर्ट करावा, आणि त्यानंतर तो माजिस्ट्रेट सांगेल त्याप्रमाणें करावें.

बेवारसी मिळकत पोलिसानें ताब्यांत घ्यावी.

९३. (१) गेल्या शेवटल्या कलमाअन्वयें अगर सन १८६७ चा मुंबईचा गांवचा पोलीस आक्ट, कलम १९, या अन्वयें ज्या मिळकतीबद्दल माजिस्ट्रेटाकडे रिपोर्ट केला असेल, ती मिळकत मृत्युपत्र न करितां मेलेल्या व ज्याचे वारस असल्याबद्दल माहिती नाहीं अशा मनुष्याची आहे आणि ती जाहीर लिलावानें विकल्यानें तिच्यापासून दाहांपेक्षां जास्त रुपये नक्की उत्पन्न होतील असा संभव आहे असा त्या माजिस्ट्रेटाचा अभिप्राय असल्यास, त्यानें त्या मिळकतीची सन १८२७ चें रेग्युलेशन ८ चें (वारस किंवा मामुल चालीप्रमाणें वारशाची वहिवाट करणार किंवा मृत्युपत्र चालविणार मान्य होण्याविषयीं वगैरे आक्ट) याच्या १० व्या कलमाच्या ठरावांअन्वयें अगर अमलांत असलेल्या इतर कायद्याअन्वयें व्यवस्था करावयाच्या उद्देशानें जिल्हा जज्जास कळविलें पाहिजे.

अशा मिळकतीची माजिस्ट्रेटानें व्यवस्था करणें.

(२) इतर कोणत्याहि प्रसंगीं, त्या माजिस्ट्रेटानें, जाहिरनामा काढावा. त्या मिळकतींत अमुक डाग आहेत असा व त्या मिळकतीवर ज्या कोणत्याहि मनुष्याचा हक्क असेल त्या मनुष्यानें जाहिरनाम्याच्या तारखेपासून साहा महिन्यांच्या आंत आपला हक्क त्या माजिस्ट्रेटापुढें अगर या कारणासाठीं तो माजिस्ट्रेट ज्या कोणत्याहि इतर अमलदारास नेमील त्या अमलदारापुढें शाबीत केला पाहिजे असा जाहिरनामा काढावा.

सदरील मुदतींत त्या मिळकतीवर जर कोणत्याहि मनुष्यानें आपला हक्क स्थापित केला नाहीं, तर ती सरकाराकडून व्यवस्था केली जाण्यास पात्र होईल, आणि त्या माजिस्ट्रेटाच्या हुकुमावरहुकुम ती जाहीर लिलावानें विकण्याचा अखत्यार आहे.

(३) सदरीं सांगितलेल्या रेग्युलेशनच्या १० व्या कलमांतील ठराव, मृत्युपत्र केल्याशिवाय मेलेल्या मनुष्याच्या मिळकतीची व्यवस्था कोणत्याहि माजिस्ट्रेटानें पोट-कलम (२) अन्वयें लाविली असेल त्या मिळकतीस लागू होणार नाहीं असें समजावें.

लवकर नासणारा माल ताबडतोब विकण्याचा अधिकार.

९४. सदरीं सांगितल्याप्रमाणें ज्या मिळकतीबद्दल रिपोर्ट केला असेल ती स्वभावत: लवकर नासण्याजोगी असल्यास, अगर तींत जिवंत जनावरें असल्यास, अगर ती पांच रुपयांपेक्षां कमी किमतीची दिसत असल्यास ती जाहीर लिलांवानें विकण्याविषयीं ताबडतोब हुकुम करण्याचा त्या माजिस्ट्रेटास अखत्यार आहे; आणि गेल्या शेवटल्या कलमांतले ठराव, लागू करितां येतील तेथवर, त्या विक्रीच्या नक्की उत्पन्नास लागू केले जातील असें समजावें.

वरिष्ठ दर्जाच्या पोलीस अमलदारास, त्याच्या खालच्या दर्जाच्या अमलदारास सांगितलेलीं कामें करण्याचा अखत्यार आहे.

९४. अ. कान्स्टेबलच्या वरच्या दर्जाच्या कोणत्याहि पोलीस अमलदारास, आपल्या हाताखालच्या कोणत्याहि अमलदारास कायद्यानें अगर कायदेशीर हुकुमानें सांगितलेलें कोणतेंहि काम करण्याचा अखत्यार आहे, आणि त्या हाताखालच्या अमलदारास कोणतेंहि काम सांगितलें असेल तेव्हां, कोणत्याहि वरिष्ठ अमलदारास, अवश्य दिसेल त्या प्रसंगीं, आपल्या स्वत:च्या कृत्यानें किंवा आपल्या हुकुमाखालीं अगर अधिकाराखालीं कायदेशीर रीतीनें काम करीत असलेल्या कोणत्याहि मनुष्याच्या कृत्यानें, त्या हाताखालच्या अमलदाराच्या कामास मदत करण्याचा, त्यास पुरवणी करण्याचा, तें रद्द करण्याचा अगर न होऊं देण्याचा अखत्यार आहे.

---

## बाब ६ वी.—अपराध व शिक्षा.

रस्त्यांतल्या विवक्षित अपराधाबद्दल व पीडांबद्दल शिक्षा.

९९. मुंबई सरकारी गॅझेटांत जाहीरनामा देऊन गव्हर्नर इन् कौन्सिल ज्या प्रदेशास हें कलम अगर त्याचा कोणताहि भाग वेळोवेळीं लागू करितील त्या प्रदेशांत जो कोणताहि मनुष्य त्या कलमाविरुद्ध अगर त्याचा त्या भागाविरुद्ध—

अंधाऱ्या रात्रीं दिव्याशिवाय गाडी हांकणें;

(अ) दिव्याची गरज लागणार नाहीं असें चांदणें असेल ते प्रसंग शिवाय करून इतर प्रसंगीं सूर्यास्तानंतर पाऊण तास व सूर्योदयापूर्वी एक तास या वेळांच्या दरमियान कोणत्याहि वेळीं कोणत्याहि प्रकारचें वाहन पुरता उजेड पडे अशा दिव्याशिवाय अगर दिव्यांशिवाय कायदेशीर कारणावांचून, कोणत्याहि रस्त्यांतून हांकीत नेईल अगर कोणत्याहि रस्त्यांत उभें ठेवील, त्यास;

रस्त्यासंबंधीं नियमाकडे दुर्लक्ष करणें;

(ब) कोणत्याहि रस्त्यांतून कोणत्याहि प्रकारचें वाहन हांकिते वेळेस (पुढें सांगितल्याप्रमाणें न वागण्यास खरोखरी निकडीचें अगर वाजवी कारण असेल ते प्रसंग खेरीज करून,) समोरून कोणतेंहि इतर वाहन आलें असतां त्या रस्त्याच्या डाव्या बाजूनें जाणार नाहीं अगर इतर कोणत्याहि वाहनाच्या जवळून जाते वेळेस त्या रस्त्याच्या उजव्या बाजूनें जाणार नाहीं, त्यास;

अपुरी राखण ठेवलेलें गुरूं वगैरे रस्त्यावर ठेवणें;

(क) कोणत्याहि रस्त्यांत अपुरी राखण ठेवलेलें अगर अपुरा बंदोबस्त केलेलें जनावर अगर वाहन राहूं देईल, त्यास;

जनावरांकडून अडथळा अगर नुकसान करविणें;

(ड) कोणतेंहि जनावर अगर वाहन हांकतांना, त्यावर देखरेख ठेवतांना अगर तें सांभाळतांना कोणत्याहि प्रकारच्या गैरवर्तनानें, गफलतीनें अगर वाईट रीतीनें वागवण्यानें किंवा इमारती लांकडें, काठ्या

अगर इतर अवजड जिन्नस यांनीं लादलेलें कोणतेंहि वाहन अगर जनावर, या बाबतींत केलेल्या व जिल्हा-माजिस्ट्रेटानें प्रसिद्ध केलेल्या कोणत्याहि नियमाविरुद्ध, कोणत्याहि रस्त्यांतून हांकण्यानें कोणत्याहि रस्त्यांत अडथळा, इजा, भीति अगर धास्ती उत्पन्न करील अगर नुकसान करील, त्यास;

(इ) कोणत्याहि रस्त्यांत, कोणतेंहि जनावर अगर वाहन भाड्याकरितां अगर विकावयाकरितां ठेवील, कोणतेंहि सामान अगर वाहन साफ करील, किंवा कोणत्याहि घोड्यास अगर इतर जनावरास साफ करील, खरारा करील, शिकवील किंवा वठणीस आणील, किंवा, कोणतेंहि वाहन अगर त्याचा कोणताहि भाग (अपघाताच्या वेळीं जागचे जागीं दुरुस्त करण्याचे जरूरीचे प्रसंग खेरीजकरून इतर प्रसंगीं) तयार अगर दुरुस्त करील, किंवा त्या रस्त्यांत रहदारीस फार अडचण अगर तेथें राहणाऱ्यांस अगर इतर लोकांस फार त्रास होईल असें कोणतेंहि कारखान्याचें काम अगर इतर कृत्य करील, त्यास; — कोणतेंहि जनावर भाड्याकरितां, अगर विकावयाकरितां वगैरे रस्त्यावर ठेवणें;

(फ) ज्या कोणत्याहि जनावरावर अगर वाहनांत ओझें लादावयाचें असेल अगर ज्यावरून अगर ज्यांतून ओझें उतरावयाचें असेल अगर ज्यास उतारू घ्यावयाचे अगर उतरावयाचे असतील त्या जनावरास अगर वाहनास तें काम करण्यास जो वेळ जरूर असेल त्यापेक्षां जास्त वेळ कोणत्याहि रस्त्यांत राहूं देऊन अगर उभें करून अथवा कोणत्याहि रस्त्यांत कोणतेंहि वाहन उभें ठेवून अगर गुरें बांधून, अथवा कोणत्याहि रस्त्याच्या कोणत्याहि भागाचा वाहनांच्या अगर गुरांच्या अड्ड्याप्रमाणें उपयोग करून, अथवा कोणत्याहि रस्त्यांत अगर रस्त्यावर कोणतीहि पेटी, गठ्ठा, प्याकेज अगर इतर कोणतीहि वस्तु गैर वाजवी वेळपर्यंत राहूं देऊन, अथवा, जिल्हा-माजिस्ट्रेटानें करून प्रसिद्ध केलेल्या कोणत्याहि नियमाविरुद्ध, कोणतेंहि पाल छप्पर, फळी, पीप, अथवा टोपली, यांत अगर यांवर कोणतीहि जिन्नस विकावयास ठेवून अगर मांडून अगर इतर कोणत्याहि रीतीनें कोणत्याहि रस्त्यांत अडथळा करील, त्यास; — रस्त्यांत अडथळा करणें;

(ग) कोणत्याहि पायरस्त्यांत अडथळा करील, अथवा कोणत्याहि पायरस्त्यावरून कोणतेंहि जनावर हांकून, अगर कोणत्याहि जनावरावर बसून जाऊन अगर कोणतेंहि जनावर सोडून देऊन किंवा अशा पायरस्त्यावर कोणतेंहि वाहन हांकून अगर ओढून नेऊन अथवा त्या पायरस्त्यांत अगर त्यावर आडवें उभें राहील असें कोणतेंहि जनावर बांधून भीति, भय, अगर त्रास उत्पन्न करील, त्यास; — पायरस्त्यांत अडथळा करणें;

(ह) गर्दी जमेल अशा प्रकारचे सोंगांचे, गानवादनाचे अगर इतर प्रकारचे तमाशे जिल्ह्याच्या माजिस्ट्रेटानें करून प्रसिद्ध केलेल्या कोणत्याहि नियमाविरुद्ध करील, अगर जाणाऱ्या येणाऱ्यांस प्रतिबंध होण्यासारख्या अगर रहिवाशांस त्रास होण्यासारख्या मोठाल्या जाहिराती, चित्रें, प्रतिमा व चिन्हें कोणत्याहि रस्त्यांतून नेईल अगर रस्त्यांत ठेवील, त्यास; — सोंगांचे, गानवादनाचे अगर इतर प्रकारचे तमाशे वगैरे रस्त्यांत करणें;

(हह) कोणत्याहि रस्त्यांत, जुगार खेळण्याच्या अगर पैज मारण्याच्या कारणासाठीं इतरांबरोबर जमेल अगर त्या कारणासाठीं जमलेल्या कोणत्याहि मंडळीस मिळेल, त्यास;

सार्वजनिक रस्त्यांवर अगर रस्त्यांजवळ त्रासकारक कृत्यें करणें ;

(जे) कोणतेंहि जनावर मारण्यासाठीं, मारलेलें जनावर अगर कातडें साफ करण्यासाठीं, शौचास जाण्यासाठीं, स्नानासाठीं अगर आंग धुण्यासाठीं डिस्ट्रिक्ट माजिस्ट्रेटाच्या अगर या संबंधानें कायदेशीर अधिकार असलेल्या इतर मनुष्याच्या हुकुमावरून वेगळी राखून ठेवलेली जागा शिवाय करून कोणत्याहि रस्त्यांत अगर रस्त्याजवळ आणि रस्त्यापासून दिसेल अशा जागीं जवळच्या रहिवाशांस अगर जाणाऱ्यायेणाऱ्या लोकांस त्रास होईल अशा रीतीनें तसें कोणतेंहि कृत्य करील, त्यास;

घोडे मोकळे सोडणें आणि मुसकें न घातलेले उग्र कुत्रे मोकळे राहूं देणें;

(के) कोणत्याहि घोड्यास अगर इतर जनावरास, लोकांस भय, इजा, धास्ती, अगर त्रास उत्पन्न होई अशा रीतीनें हयगयीनें मोकळें सोडून देईल अगर कोणत्याहि उग्र कुत्र्यास मुसकें घातल्यावांचून मोकळें राहूं देईल, अगर, कोणत्याहि मनुष्यावर किंवा घोड्यावर किंवा इतर जनावरावर चालून जाण्यासाठीं, त्यास त्रास देण्यासाठीं किंवा भिवावण्यासाठीं कोणत्याहि कुत्र्यास किंवा इतर जनावरास भर भरील किंवा चिथवील, त्यास;

स्नानाकरितां अगर धुण्याकरितां राखून न ठेवलेल्या जागीं स्नान करणें अगर धुणें;

(ल) स्नानाकरितां अगर धुण्याकरितां जिल्हा माजिस्ट्रेटानें अगर या बाबतींत कायदेशीर अधिकार असलेल्या इतर मनुष्यानें राखून न ठेवलेल्या कोणत्याहि सार्वजनिक विहिरींत, टांक्यांत, तलावांत, तळ्यांत, कुंडांत, नहरांत अगर नदीचे, ओढ्याचे, नाल्याचे, अगर पाण्याच्या पुरवठ्याचा जो कोणताहि उगम अगर साधन त्याचे कोणतेंहि भागांत, अगर त्याजवळ, अंघोळ करील, अगर धुवील, त्यास;

सार्वजनिक विहिरी वगैरे यांतील पाणी खराब करणें;

(म) कोणत्याहि सार्वजनिक विहिरींतील, टांक्यांतील, तलावांतील, तळ्यांतील, कुंडांतील, नहरांतील अगर नदीचे, ओढ्याचे, नाल्याचे अगर पाण्याच्या पुरवठ्याच्या इतर उगमाचे अगर साधनाचे कोणतेंहि भागांतील पाणी ज्या कामाकरितां सदरीं सांगितल्याप्रमाणें राखून ठेविलेलें असेल त्या कामास कमी उपयोगी पडेल अशा रीतीनें खराब करील अगर करवील, त्यास ;

स्नान करणाऱ्यांस अडचण करणें ;

(न) सदरींप्रमाणें स्नानासाठीं राखून ठेवलेल्या कोणत्याहि जागेंत स्नान करीत असलेल्या कोणत्याहि मनुष्यास, जाणूनबुजून आंत शिरून अगर ती जागा सदरींप्रमाणे ज्या कारणासाठीं राखून ठेविलेली नसेल त्या कारणासाठीं तिचा उपयोग करून, अडचण अगर गैरसोय करील, त्यास;

लोकांसमक्ष असभ्य वर्तन ;

(ओ) कोणत्याहि रस्त्यांत, किंवा लोकांच्या जाण्यायेण्याच्या जागेंत, किंवा कोणत्याहि सार्वजनिक कचेरींत, स्टेशनांत अगर स्टेशनाचे इमारतींत जाणूनबुजून व निर्लज्ज रीतीनें आपलें शरीर उघडें ठेवील, बीभत्स भाषण करील किंवा निलाजरेपणानें, दांडगाईनें अगर अव्यवस्थितपणें वागेल, त्यास ;

दारू पिऊन धुंद होणें;

(प) दारू पिऊन कोणत्याहि रस्त्यांत अगर लोकांच्या जाण्यायेण्याच्या जागीं स्वतःचा सांभाळ करवत नाहीं इतका धुंद होईल, त्यास ;

(पप) रस्त्यांतून जाणाऱ्या कोणत्याहि मनुष्यास जाणूनबुजून ढकलील, दाटी करील, धक्का देईल अगर अडथळा करील, त्यास, अगर मस्तीचे चाळे करून अगर धमकावणीचे हावभाव करून विनाकारण कोणत्याहि मनुष्यास छळून, किंकाळ्या फोडून, ओरडून, बुद्धया घोड्यांस अगर गुरांस बुजवून, अगर इतर रीतीनें सार्वजनिक स्वस्थता अगर व्यवस्था हिचा भंग करील, त्यास;

(फप) शांततेचा भंग व्हावा अशा इराद्यानें, अगर ज्यांपासून शांततेचा भंग होण्याचा संभव आहे असे, धमकीचे, शिवीगाळीचे अगर अपमानास्पद शब्द कोणत्याहि रस्त्यांत बोलेल अगर तशी वर्तणूक करील, त्यास; — शांततेचा भंग व्हावा अशा इराद्यानें गैरवर्तन करणें;

(र) कोणत्याहि रस्त्यांत, अगर रस्त्याजवळ, अगर रस्त्यांतून दिसे अशा जागीं लोंचटपणें भिक्षेकरितां विनवणी करील किंवा दया आणण्याच्या उद्देशानें कोणतीहि कुरूपता, रोग, अगर कोणतेंहि किळस आणणारें क्षत अगर जखम उघड करून दाखवील, त्यास; — भीक मागणें आणि किळस आणणारे रोग उघडे करून दाखविणें;

दंडाची शिक्षा दिली पाहिजे व तो दंड पन्नास रुपयेपर्यंत ठरविण्याचा अख्त्यार आहे.

९६. जो कोणताहि मनुष्य, कोणत्याहि जनावरास निर्दयपणें बडवील, बडववील अगर बडवायास लावील, किंवा त्यास काठी वगैरे टोंचील, टोंचवील अगर टोंचायास लावील, किंवा त्याकडून जास्त काम घेईल, घेववील अगर घ्यायास लावील, किंवा वाईट रीतीनें वागवील, वागववील अगर वागवायास लावील किंवा त्याचे हाल करील, करवील अगर करावयास लावील त्यास कैदेची शिक्षा दिली पाहिजे, व ती एक महिनापर्यंत ठरविण्याचा अख्त्यार आहे अगर त्यास दंडाची शिक्षा दिली पाहिजे व तो दंड शंभर रुपयेपर्यंत ठरविण्याचा अख्त्यार आहे, अगर त्यास दोन्ही शिक्षा दिल्या पाहिजेत. — जनावरास क्रूरपणा केल्याबद्दल शिक्षा.

९७. जो कोणताहि पोलीस अमलदार— — पोलिसानें त्रासदायक रीतीनें झाडा घेतल्याबद्दल व धरल्याबद्दल शिक्षा.

(अ) कायदेशीर अधिकाराशिवाय अगर वाजवी कारणाशिवाय कोणत्याहि इमारतींत, तारवांत, तंबूंत अगर जागेंत शिरेल अगर (इतर मनुष्यास) शिरवील किंवा तिचा झाडा घेईल अगर घेववील; अगर

(ब) कोणत्याहि मनुष्याची मिळकत त्रासदायक रीतीनें आणि निष्कारण धरील ; अगर

(क) कोणत्याहि मनुष्यास त्रासदायक रीतीनें व निष्कारण अटकेंत ठेवील, त्याचा झाडा घेईल, अगर त्यास धरील; अगर

(ड) आपल्या अटकेंत असलेल्या कोणत्याहि मनुष्यावर विनाकारण शारीरिक जबरदस्ती करील; अगर

(इ) कायदेशीर नाहीं अशी कोणतीहि धमकी अगर वचन कोणत्याहि आरोपीस देईल;

त्यास अशा प्रत्येक अपराधाबदल दोन महिन्यांपेक्षां जास्त नाहीं इतक्या मुदतीची शिक्षा दिली पाहिजे, अगर दंडाची शिक्षा दिली पाहिजे व तो दंड पांचशें रुपयेपर्यंत ठरविण्याचा अख्त्यार आहे, अगर त्यास दोन्ही शिक्षा दिल्या पाहिजेत.

धरलेल्या मनुष्यास पाठविण्यांत त्रासदायक विलंब झाला असतां शिक्षा.

५८. जो कोणताहि पोलीस अमलदार, कोणत्याहि धरलेल्या मनुष्यास माजिस्ट्रेटाकडे अगर ज्या इतर अधिकाऱ्याकडे त्या मनुष्यास पाठविणें त्या अमलदारास कायद्यावरून भाग असेल त्या अधिकाऱ्याकडे पाठविण्यास त्रासदायक रीतीनें आणि विनाकारण विलंब लावील, त्यास दंडाची शिक्षा दिली पाहिजे व तो दंड दोनशें रुपयेपर्यंत ठरविण्याचा अखत्यार आहे.

कलम ३७ खालचे कानू अगर कलम ४९ खालचे हुकुम मोडल्याबद्दल शिक्षा.

५९. जो कोणताहि मनुष्य—

(अ) कलम ३७ अन्वयें केलेला कोणताहि कानू मोडील, अगर

(ब) कलम ४९ अन्वयें पोलिसानें केलेल्या कोणत्याहि हुकुमास विरोध करील अगर त्याबरहुकुम वागण्यास चुकेल; अगर

(क) रकम (अ) अगर (ब) याखालचा कोणताहि अपराध करण्यांत मदत करील;

त्यास दंडाची शिक्षा दिली पाहिजे व तो दंड पन्नास रुपयेपर्यंत ठरविण्याचा अखत्यार आहे.

कलम ३८ अन्वयें केलेले कानू वगैरे मोडल्याबद्दल शिक्षा.

६०. जो कोणताहि मनुष्य कलम ३८ अन्वयें केलेल्या कानूंपैकीं कोणताहि कानू अगर त्या कानूअन्वयें दिलेल्या कोणत्याहि परवान्याची कोणतीहि अट मोडील, त्यास दंडाची शिक्षा दिली पाहिजे व तो दंड शंभर रुपयेपर्यंत ठरविण्याचा अखत्यार आहे.

कलम ३९ खालीं केलेला हुकुम मानण्यास चुकल्याबद्दल शिक्षा.

६१. जो कोणताहि मनुष्य, कलम ३९ अन्वयें केलेल्या कोणत्याहि हुकुमाबरहुकुम वागण्यास चुकेल, त्यास, त्याकडून तो हुकुम मानिला जाणार नाहीं त्या प्रत्येक दिवसाबद्दल दंडाची शिक्षा दिली पाहिजे व तो दंड पंचवीस रुपयेपर्यंत ठरविण्याचा अखत्यार आहे.

कलमें ४०, ४० अ, ४० ब, ४३ व ४४ यांखालचे कानू अगर हुकुम मोडल्याबद्दल शिक्षा.

६२. जो कोणताहि मनुष्य—

(अ) कलम ४०, ४० अ, अगर ४० ब अन्वयें कायदेशीर रीतीनें केलेला कोणताहि हुकूम पाळणार नाहीं; अगर

(ब) कलम ४३ अन्वयें पोलिसानें केलेल्या कोणत्याहि हुकुमास विरोध करील अगर त्याबरहुकुम वागण्यास चुकेल; अगर

(क) कलम ४४ अन्वयें पोलिसानें केलेल्या कोणत्याहि कानूस अगर दिलेल्या कोणत्याहि हुकुमास विरोध करील अगर तो अमान्य करील; अगर

(ड) सदरील कलमाच्या (ब) रकमेअन्वयें दिलेल्या परवान्याची कोणतीहि अट मोडील; अगर

(इ) रकम (अ), (ब), (क) अगर (ड) खालचा कोणताहि अपराध करण्यांत मदत करील;

त्यास दंडाची शिक्षा दिली पाहिजे, व तो दंड दोनशें रुपयेपर्यंत ठरविण्याचा अखत्यार आहे.

कलम ४१ या खालचा नियम मोडल्याबद्दल शिक्षा.

६३. जो कोणताहि मनुष्य, कलम ४१ अन्वयें केलेल्या कोणत्याहि नियमाचा भंग करील अगर भंग करण्यांत मदत करील, त्यास कैदेची शिक्षा दिली पाहिजे व ती कैद तीन महिनेपर्यंत ठरविण्याचा अखत्यार आहे अगर त्यास दंडा-

ची शिक्षा दिली पाहिजे व तो दंड दोनशें रुपयेपर्यंत ठरविण्याचा अख़्त्यार आहे, अगर त्यास दोन्ही शिक्षा दिल्या पाहिजेत.

६४. जो कोणताहि मनुष्य, कलम ४२ अन्वयें कोणत्याहि जिल्ह्याच्या माजिस्ट्रेटानें अगर पोट-तुकडीच्या माजिस्ट्रेटानें केलेल्या कोणत्याहि हकुमास विरोध करील अगर तो अमान्य करील किंवा अशा हुकुमाचा विरोध करण्यांत अगर तो अमान्य करण्यांत मदत करील, त्यास कैदेची शिक्षा दिली पाहिजे व ती कैद एक महिनापर्यंत ठरविण्याचा अख़्त्यार आहे, अगर त्यास दंडाची शिक्षा दिली पाहिजे व तो दंड शंभर रुपयेपर्यंत ठरविण्याचा अख़्त्यार आहे, अगर त्यास दोन्ही शिक्षा दिल्या पाहिजेत.

कलम ४२ अन्वयें केलेला हुकुम मोडल्याबद्दल शिक्षा.

६५. जो कोणताहि मनुष्य, कलम ५० अन्वयें कोणत्याहि माजिस्ट्रेटानें किंवा पोलिस अमलदारानें केलेल्या कोणत्याहि वाजवी हुकुमास विरोध करील अगर तो हुकुम तावडतोब मान्य करणार नाहीं किंवा तशा हुकुमाचा विरोध करण्यांत अगर तो हुकुम अमान्य करण्यांत मदत करील त्यास कैदेची शिक्षा दिली पाहिजे व ती कैद तीन महिनेपर्यंत ठरविण्याचा अख़्त्यार आहे, अगर त्यास दंडाची शिक्षा दिली पाहिजे व तो दंड पांचशें रुपयांपर्यंत ठरविण्याचा अख़्त्यार आहे, अगर त्यास दोन्ही शिक्षा दिल्या पाहिजेत.

कलम ५० अन्वयें केलेल्या हुकुमास विरोध केल्याबद्दल अगर तो न मानिल्याबद्दल शिक्षा.

६६. ह्या आक्टाच्या विरुद्ध अपराधांचा इन्साफ, आरोपित मनुष्य अगर आरोपित मनुष्यांपैकीं कोणताहि मनुष्य कान्स्टेबलाच्या वरच्या दर्जापैकीं पोलीस अमलदार असेल तेव्हां, दुसऱ्या वर्गाहून खालच्या दर्जाच्या माजिस्ट्रेटानें करूं नये.

अपराधी जेव्हां कान्स्टेबलाच्या वरच्या दरजाचा पोलीस अमलदार असेल, तेव्हां इन्साफाचा अधिकार कोणाकडे तें.

६७. कलमें ५५, ५६, ५९, ६१, ६२, ६३, अगर ६४, यांत ज्या अपराधांस शिक्षा सांगितली आहे त्यांपैकीं ज्या कोणत्याहि अपराधावरून विशेष अपाय झाला नसेल, आणि ताकीद दिल्याबरोबर जें करणें बंद झालें असेल, त्या अपराधाबद्दल फिर्याद करणें पोलीसास भाग पडणार नाहीं.

ह्या आक्टाविरुद्ध विशिष्ट अपराधांबद्दल फिर्याद करणें पोलिसाच्या नजरेवर आहे.

६८. ह्या आक्टांत ज्या कोणत्याहि अपराधास शिक्षा सांगितली आहे त्या अपराधाबद्दल इतर कोणत्याहि कायद्यावरून कोणत्याहि मनुष्यावर फिर्याद करण्यास अगर अशा अपराधास ह्या आक्टांत जी शिक्षा सांगितली आहे त्या शिक्षेहून जास्त शिक्षा कोणत्याहि इतर कायद्यावरून त्या मनुष्यास देण्यास प्रतिबंध होईल असा ह्या आक्टांतील कोणत्याहि ठरावाचा अर्थ करूं नये. मात्र, एकाच अपराधाबद्दल कोणत्याहि मनुष्यास दोनदां शिक्षा होणार नाहीं; आणि, या आक्टाच्या कोणत्याहि ठरावाअन्वयें कोणत्याहि अपराधाचा केलेला इन्साफ, तो अपराध अगर ती गोष्ट कोणत्याहि इतर कायद्याअन्वयें इन्साफ केला जाण्यास पात्र असल्यावरून, बेकायदेशीर आहे असें मानिलें जाणार नाहीं.

अपराधाबद्दल इतर कायद्यांअन्वयें फिर्याद करण्यास ह्या आक्टावरून बाध येत नाहीं.

---

## बाब ७ वी.

### किरकोळ.

६९. पोलीस अमलदारांनीं प्रोसेस लागू करण्याबद्दल आदा झालेल्या सर्व रकमा, आणि बातमी देणारे या नात्यानें पोलीस अमलदारांस देणें झालेलीं सर्व इनामें, जप्त झालेला सर्व ऐवज व गुन्हेगारीच्या सर्व रकमा अगर यांचा कोणताहि भाग, हीं, या कलमांत यापुढें दिलेले प्रसंग शिवाय करून इतर प्रसंगीं, सरकारांत जमा केलीं पाहिजेत; ह्मणजे, सरकारची मंजुरी घेऊन अगर या संबंधानें सरकारानें केलेला कोणताहि कानू लागू राहून, असें सगळें इनाम, असा जप्त झालेला सर्व ऐवज अगर अशा गुन्हेगारीच्या सर्व रकमा, अगर यांचा कोणताहि भाग, विशे-

पोलीस अमलदारांस आदा करावयाच्या इनामाची वगैरे व्यवस्था.

ष काम केल्यावरून कोणत्याहि पोलीस अमलदारास देण्याचा अगर दोन किंवा अधिक पोलीस अमलदारामध्यें वांटून देण्याचा अखत्यार आहे.

*जिल्हा माजिस्ट्रेटाचा गांव-अमलदारांवरचा अधिकार डिस्ट्रिक्ट सुपरिंटेंडेंटाकडे सोंपून देण्याचा अखत्यार आहे.*

७०. कोणत्याहि जिल्ह्याच्या माजिस्ट्रेटास कोणत्याहि गांव पोलीस अमलदारावर पोलीससंबंधी जो कोणताहि अधिकार असेल तो अधिकार डिस्ट्रिक्ट सुपरिंटेंडेंटाकडे सोंपून देण्याचा त्या माजिस्ट्रेटास अखत्यार आहे.

*पोलिसाच्या इमारतींबद्दल सरकार कोणतेंहि म्युनिसिपल अगर इतर कर देणार नाहीं.*

७१. (१) पोलीस फौजेच्या लोकांनीं, आपलीं कामें सोईनें करतां यावीं ह्मणून, कोणत्याहि घराचा अगर जागेचा भोगवटा अगर उपयोग केल्याबद्दल कोणताहि म्युनिसिपल अगर इतर स्थानिक कर देणें सरकारास भाग पडणार नाहीं.

*पोलिसाकरितां जागेची सोय करण्याबद्दल म्युनिसिपालिट्यांस हुकूम करण्याचा अखत्यार आहे.*

(२) शांतता व सार्वजनिक बंदोबस्त राखण्यासाठीं, सार्वजनिक संरक्षणासाठीं आणि गुन्हे न होऊं देण्यासाठीं कोणत्याहि म्युनिसिपालिटीच्या नोकरींत तिच्या हद्दींच्या आंत जी कोणतीहि पोलीस फौज ठेविलेली असेल, त्या तसें काम करणाऱ्या पोलीस फौजेस वाजवी रीतीनें जरूर लागेल तितकी जागेची सोय अगर तीपैकीं सरकारास रास्त व योग्य वाटेल तितकी जागेची सोय, सरकारानें हुकुम केला असतां, त्या म्युनिसिपालिटीनें केली पाहिजे.

*अशा जागेची सोय करणें हें मुंबईच्या डिस्ट्रिक्ट म्युनिसिपल आक्टांत सांगितलेल्या कामांपैकीं एक काम आहे.*

(३) सदरीं सांगितल्याप्रमाणें जागेची सोय करणें अगर या कलमांतील इतर मागण्या मान्य करणें हें, सन १८७३ व १८८४ चे मुंबईचे डिस्ट्रिक्ट म्युनिसिपल आक्ट यांत सांगितलेल्या कामांपैकीं एक काम आहे असें समजावें.

*ह्या आक्टाअन्वयें काढिलेले हुकुम व जाहिरनामे शाबीत करण्याची रीत.*

७१ अ. ह्या आक्टांतील कोणत्याहि ठरावाअन्वयें सरकारानें, अगर कोणत्याहि माजिस्ट्रेटानें, अगर अमलदारानें प्रसिद्ध केलेला अगर काढलेला कोणताहि हुकुम अगर जाहिरनामा शाबीत करावयाचा असल्यास अगर तो योग्य रीतीनें प्रसिद्ध केला आहे अगर काढिला आहे हें शाबीत करावयाचें असल्यास त्या हुकुमाची अगर जाहिरनाम्याची सरकारी गॅझेटांतली प्रत, अगर अशा माजिस्ट्रेटानें किंवा अमलदारानें सही केलेली आणि त्या हुकुमास अगर जाहिरनाम्यास लागू असलेल्या या आक्टांतील कलमाच्या ठरावांप्रमाणें प्रसिद्ध केलेल्या व काढलेल्या असलावरहुकुम खरी नकल असल्याबद्दल त्या माजिस्ट्रेटानें अगर असलदारानें प्रतिज्ञालेख केलेली एक नकल सादर केली पाहिजे.

*पद्धतींत दोष असल्यावरून अगर काम चालविण्यांत अनियमितपणा झाल्यावरून कानू व हुकुम निरुपयोगी मानूं नयेत.*

७१ ब. केलेला अगर प्रसिद्ध केलेला कोणताहि कानू, हुकुम, ताकीद, निवाडा, चौकशी अगर जाहिरनामा, आणि ह्यांत दिलेल्या कोणत्याहि ठरावाअन्वयें अगर वास्तविकपणें त्या ठरावास अनुसरून केलेलें कोणतेंहि कृत्य, हीं, पद्धतींत अगर प्रसिद्ध करण्यांत कोणताहि दोष असल्याच्या अगर काम चालविण्यांत कोणताहि अनियमितपणा झाल्याच्या कारणावरून बेकायदेशीर, रद्द, निरुपयोगी अगर अपुरींशीं मानिलीं जाणार नाहींत असें समजावें.

*कर्तव्यास अनुसरून इमानें इतबारें केलेल्या कोणत्याहि कृत्याबद्दल कोणताहि माजिस्ट्रेट अगर पोलीस अमलदार गुन्हेगारीस अगर नुकसान भरून देण्यास पात्र होणार नाहीं.*

७२ (१) ह्या आक्टाच्या कोणत्याहि ठरावावरून अगर त्या अन्वयें कायदेशीरपणें केलेल्या अगर दिलेल्या कोणत्याहि कानूवरून, हुकुमावरून अगर ताकिदीवरून कोणत्याहि माजिस्ट्रेटास अगर पोलीस अमलदारास प्राप्त झालेल्या कर्तव्यास अगर अधिकारास अनुसरून अगर अनुसरण्याच्या इराद्यानें त्या माजिस्ट्रेटानें अगर अमलदारानें इमानेंइतबारें केलेलें जें कोणतेंहि कृत्य, त्याबद्दल तो कोणत्याहि गुन्हेगारीस अगर नुकसान भरून देण्यास पात्र होणार नाहीं.

*अधिकार आहे असें समजून केलेला कोणताहि कानू हुकुम, अगर ताकीद इमानेंइतबारें अमलांत आणिल्याबद्दल कोणताहि सरकारी नोकर सदरीं प्रमाणें पात्र होणार नाहीं.*

(२) सरकारानें अधिकार आहे असें समजून अगर सदरील प्रकारचा हुकुम अगर ताकीद देण्यास ह्या आक्टाअन्वयें अगर त्याच्या कोणत्याहि ठरावाखालीं केलेल्या कोणत्याहि कानूअन्वयें अधिकार असलेल्या कोणत्याहि मनुष्यानें केलेला सदरील प्रकारचा हुकुम अगर ताकीद इमानेंइतबारें अमलांत आणिल्याच्या कारणावरून, यो-

ग्य रीतीनें नेमिलेला अगर अधिकार दिलेला कोणताहि सरकारी नोकर अगर मनुष्य सदरीं सांगितल्याप्रमाणें पात्र होणार नाहीं.

(३) सदरीं सांगितलेल्या कोणत्याहि कर्तव्याचें अगर अधिकाराचें निमित्त दाखवून अगर त्या कर्तव्याचें अगर अधिकाराचें उल्लंघन करून केलेल्या कृत्याच्या योगानें कोणत्याहि माजिस्ट्रेटानें, पोलीस अमलदारानें, अगर इतर मनुष्यानें अपराध केला आहे अगर नुकसान केलें आहे असें कोणाचें ह्मणणें असल्यास त्या बाबतींत, किंवा, तो अपराध अगर नुकसान केलेलें असल्यास तो सदरील प्रकारचा आहे असें कोर्टास दिसून आल्यास त्या बाबतींत, ती फिर्याद अगर दावा, ज्या कृत्याबद्दल तक्रार असेल तें कृत्य घडल्यानंतर साहा महिन्याच्या पुढें केलेला असल्यास, घेतली जाणार नाहीं अगर काढून टाकिली जाईल.

सदरीं प्रमाणें कर्तव्याच्या निमित्यानें केलेल्या कृत्याबद्दल फिर्याद अगर दावा, साहा महिन्यांच्या आंत केला नाहीं तर, घेतला जाणार नाहीं अगर काढून टाकिला जाईल.

(४) सदरील प्रकारच्या नुकसानाबद्दल दावा करावयाचा इरादा असल्यास, तसा इरादा असलेल्या मनुष्यानें, ज्यानें नुकसान केलें असें ह्मणणें असेल त्या मनुष्यास, आपल्या इराद्याची नोटीस निदान एक महिना अगोदर दिली पाहिजे व ज्या नुकसानाबद्दल तक्रार असेल त्याचा पुरा तपशील, पुरविला पाहिजे; आणि असें न केल्यास दावा काढून टाकिला जाईल.

सदरील प्रकारच्या दाव्यांत एका महिन्याची नोटीस दिली पाहिजे, आणि ज्या नुकसानाबद्दल तक्रार असेल, त्याचा पुरा तपशील दिला पाहिजे.

(५) सदरीं सांगितल्याप्रमाणें एक नोटीस प्रतिवादीवर अमुक तारखेस बजावण्यांत आली आहे, असा मजकूर फिर्यादअर्जींत असला पाहिजे, आणि, तींत, प्रतिवादीनें नुकसानीचा मोबदला देण्याचें कबूल केलें आहे कीं काय, व कबूल केलेला असल्यास किती कबूल केला आहे या गोष्टी नमूद केल्या पाहिजेत. सदरील नोटिशीची एक प्रत, वर शेरा करून, अगर ती केव्हां व कशी बजावण्यांत आली याबद्दलच्या वादीच्या इकरारासहित फिर्यादअर्जीबरोबर दाखल केली पाहिजे.

नोटीस केव्हां बजावण्यांत आली, व मोबदला देण्यास तयार आहे कीं काय या गोष्टी फिर्यादअर्जींत नमूद केल्या पाहिजेत.

७२ अ. (१) ह्या आक्टावरून मिळालेल्या अधिकाराबरहुकुम सरकारानें केलेल्या कोणत्याहि कानूंत अगर हुकुमांत, लोकांनीं अगर लोकांच्या अमुक वर्गानें अमुक कृत्य अगर काम करावें असें असेल तेव्हां, किंवा त्यांनीं अगर त्यांच्या ताब्यांतल्या लोकांनीं त्या कानूंत अगर हुकुमांत निर्दिष्ट केल्याप्रमाणें वागावें अगर असावें असें असेल तेव्हां, त्या संबंधाच्या कोणत्याहि मनुष्यास, तो कानू अगर हुकुम बेकायदेशीर, जुलुमाचा अगर गैरवाजवी असल्याच्या कारणावरून रद्द करण्याबद्दल, फिरविण्याबद्दल अगर बदलण्याबद्दल सरकारास अर्ज करून तो सरकारच्या कोणत्याहि सेक्रटरीकडे रुजू करण्याचा अखत्यार आहे.

संबंध असलेल्या मनुष्यास कोणताहि कानू अगर हुकुम रद्द करण्याबद्दल, फिरविण्याबद्दल अगर बदलण्याबद्दल सरकारास अर्ज करण्याचा अखत्यार आहे.

(२) सदरीं सांगितल्या प्रकारचा अर्ज केल्यानंतर आणि तो पूर्णपणें अगर अंशतः नामंजूर झाल्यानंतर किंवा अशा अर्जास जबाब आल्याशिवाय किंवा त्या अर्जावरचा सरकारचा निकाल प्रसिद्ध झाल्याशिवाय चार महिने लोटल्यानंतर, संबंध असलेल्या आणि तो कानू अगर हुकुम कायद्यास विरुद्ध आहे असें मानणाऱ्या मनुष्यास, तो कानू अगर हुकुम सर्वतः अगर अंशतः बेकायदेशीर आहे असा हैकोर्टाचा निकाल मिळविण्याकरितां त्या कोर्टांत सरकाराविरुद्ध दावा करण्याचा अखत्यार आहे. अशा दाव्यांत मिळालेल्या निकालावर अपील करितां येईल; आणि जो कानू अगर हुकुम बेकायदेशीर आहे असें अखेरीस ठरविलें जाईल, तो सरकारानें रद्द केला पाहिजे, फिरविला पाहिजे, अगर तो कायद्याप्रमाणें होईल अशा रीतीनें त्यांत बदल केला पाहिजे.

कोणताहि कानू अगर हुकुम बेकायदेशीर ठरविण्याकरितां हैकोर्टांत दावा केव्हां करितां येईल तें.

(३) कोणत्याहि इसमाविरुद्ध दावा आणण्याच्या अगर तक्रार करण्याच्या हक्कास या कलमाच्या ठरावांवरून बाध येतो असें समजूं नये.

इतर हक्कास बाध येत नाहीं.

७३. ह्या आक्टाच्या कोणत्याहि ठरावावरून सन १८८८ चा पोलीस आक्ट याच्या कोणत्याहि ठरावास बाध येणार नाहीं असें समजावें.

सन १८८८ चा पोलीस आक्ट याचा बचाव.

## परिशिष्ट अ.

(कलम २ पाहा.)

### रद्द केलेले कायदे.

| कायद्याचा नंबर व वर्ष. | सरनामा अगर विषय. | किती रद्द केला तें. |
|---|---|---|
| सन १८२७ चें मुंबईचें रेग्युलेशन नंबर १२. | सगळ्या मुंबई इलाक्यांत पोलीसपद्धत स्थापन करण्यासाठीं. | कलम १९, रकमा १, ६,७ व ८ यांतला जो भाग पूर्वीं रद्द केलेला नसेल तो. |
| | **मुंबईचे गव्हर्नर इन् कौन्सिल यांचे आक्ट.** | |
| सन१८६७ चा ७ वा. | मुंबईचा डिस्ट्रिक्ट पोलीस आक्ट. | कलमें ३३ व ३४ शिवाय करून सगळा आक्ट |
| सन१८८६ चा ३ रा. | मुंबईचा सामान्य कलमांचा आक्ट. | सन १८२७ चें रेग्युलेशन १२ वें याचें कलम. १९, रकमा १,६,७ व ८ या संबंधाचा आणि कलम ३४ वगळून सन १८६७ चा मुंबईचा आक्ट ७ या संबंधाचा परिशिष्ट ब यांतील मजकूर. |

---

## परिशिष्ट ब.

(कलम ११ पाहा.)

### पोलीस अमलदाराच्या हुद्याच्या दाखल्याचा नमुना.

जिल्हा माजिस्ट्रेटचा शिक्का.

अ. ब. यास जिल्ह्याचे पोलिसांतील असामी नेमिलें आहे; आणि सन १८८९ चा मुंबईचा डिस्ट्रिक्ट पोलीस आक्ट याअन्वयें पोलीस अमलदारास जे अधिकार, कामें आणि हक्क आहेत ते त्यास दिले आहेत.

(True Translation.)

Y. M. KELKAR,

Oriental Translator to Government.

BOMBAY : PRINTED AT THE GOVERNMENT CENTRAL PRESS.